वर्ष : सतरावे
फेब्रुवारी २०२५
अंक : दुसरा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

**लोकशाही आणि हुकुमशाही**
नरेन्द्र चपळगावकर




**पाकिस्तान का मतलब क्या?**
श्रीधर लोणी




## नवी 'राजहंसी' पुस्तके




**वीस प्रश्न**
महेश एलकुंचवार




**भीमसेन**
मंदार करंजकर
दाक्षायणी आठले
अनुवाद : आरती रानडे

# एकच ध्यास...
# समाजाचा वैचारिक विकास

**सोशल मीडियाच्या जमान्यात वाचन संस्कृती जोपासणारे ‘सद्‍गुरू सेवा प्रतिष्ठान’**





## पुस्तक वाटप

**‘लेखन-वाचन अभियानां’तर्गत संस्कारक्षम गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप**

- खटाव तालुक्यातील २७४ शाळांमध्ये बालसाहित्य संच स्वरूपात ९,००० पुस्तकांचे वाटप
- मावळ तालुक्यातील १६८ शाळांमध्ये पहिलीतील विद्यार्थ्यांना उजळणी पुस्तक भेट

## वाचनालय, ग्रंथालय

**‘गाव तेथे वाचनालय आणि शाळा तेथे ग्रंथालय’ या उद्देशाने ठोस वाटचाल**

- नंदुरबार जिल्ह्यातून सुरुवात करीत राज्यभरात ४३४ वाचनालयांची उभारणी
- तालुकास्तरावर अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा वाचनालयांची उभारणी

## विद्यार्थी साहाय्य

**ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत**

- ४५० विद्यार्थ्यांना सायकल वाटप; ७० दिव्यांगांना अत्यावश्यक साहित्य वाटप
- आदिवासी, अतिदुर्गम भाग व वीटभट्टी कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व
- शहरातील झोपडपट्ट्या व पालांवरील मुलांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न
- ६,००० महिलांना सॅनिटरी पॅड वाटप; २,००० ऊसतोड कामगार महिलांना साडी वाटप

## जुन्या/नव्या पुस्तकांचे करा सत्पात्री दान

महाराष्ट्रात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आम्ही 'गाव तेथे वाचनालय'उपक्रम राबवीत आहोत. कृपया, आपल्याकडील जुनी / नवी वाचनयोग्य पुस्तके देऊन आमच्या प्रयत्नांना बळ द्या. कथासंग्रह, काव्यसंग्रह, प्रेरणादायी पुस्तके, बालसाहित्य व स्पर्धा परीक्षा पुस्तके अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांची आम्हाला गरज असते.

**पुस्तक दान करण्यासाठी WhatsApp क्रमांक 73783 78989**

## आर्थिक मदतीचे आवाहन

'सद्‍गुरू सेवा प्रतिष्ठान'चे समाजकार्य असेच पुढे सुरू ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक, खासगी संस्था इत्यादींनी संस्थेच्या विविध उपक्रमांकरिता आर्थिक मदत करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. आपण केलेली मदत ‘८०जी’अंतर्गत प्राप्तिकर सवलतीस पात्र असेल.



**सचिन म्हसे**
संस्थापक, सद्‍गुरू सेवा प्रतिष्ठान

इंजिनीअर असलेल्या सचिन म्हसे यांनी कोरोना संसर्गाच्या काळात सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून ‘सद्‍गुरू सेवा प्रतिष्ठान’ ही संस्था सुरू केली. विद्यार्थी दत्तक योजना आणि महिला सबलीकरणातील योगदानाबद्दल सचिन म्हसे यांना ‘दक्षिण आशियाई प्रादेशिक देश (SAARC) ब्रिलियन्स २०२२’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## सद्‍गुरू सेवा प्रतिष्ठान

- नोंदणी क्रमांक - महाराष्ट्र /४१६/२०२१/(पुणे)
- ट्रस्ट रजि. नं. - एफ - ५६३२७/ पुणे
- 80G: ABNAS7596NF20224

६७/३, ज्ञानेश सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे - ४११ ०५८
ई-मेल : sachinmhase@gmail. com
www.sadgurusevapratishthan.org
**+91 73783 78989, 99223 83341**

आमच्या फेसबुक पेजला भेट देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

# राजहंस ग्रंथवेध

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक दुसरा
१५ फेब्रुवारी २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *हमरस्ता नाकारताना* - विकास कात्रे / ९
- वसा अक्षर चळवळीचा
  - *वाचनव्रत : ३०+३* - वसुंधरा पर्वते / १५
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / १९
- असे जन्मले पुस्तक!
  *पाकिस्तान का मतलब क्या?*
  - श्रीधर लोणी / २३
- आठवणींचा पारिजात
  - *'गोट्या' मालिका : एक भाग्ययोग*
  - डॉ. मानसी मागीकर / २७
- क... कवितेचा - राजीवलोचन पुंडलीक / ३१
- उद्गार -
  *शह आणि काटशह* - डॉ. श्रीराम गीत / ३३
- श्रद्धांजली
  - *न्या. (नि.) नरेन्द्र चपळगावकर*
  - भक्ती चपळगावकर, डॉ. सदानंद बोरसे,
    दिलीप माजगावकर / ३७
- राजहंसी पार / ४७
- वाचकांच्या मनातलं... / ५३

---

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




स. ह. देशपांडे यांनी अर्थकारण, समाजकारण, राष्ट्रवाद आणि ललितवाङ्मय या सर्व क्षेत्रांत पाच दशकांहून अधिक काळ मुशाफिरी करून वाचकांसमोर ठेवलेला अनुभवसमृद्ध विचारांचा ऐवज...

### ऐवज विचारांचा

स. ह. देशपांडे

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

डॉक्टर-पेशंट नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस! वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा, प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -

### शह आणि काटशह
वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)







रसिकांसाठी ही आहे आशाताईंच्या गाण्यांची अद्‌भुत सफर...
त्यांच्या गायनकलेचा जादुई परिचय...
रसास्वादासोबतच क्यूआर कोड स्कॅन करून
गाणं तत्काळ ऐकण्याची सुविधाही!

### साठवणीतली गाणी
### चिरतरुण स्वर आशा भोसले

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*कवी कालिदासांनी मनुष्याला 'उत्सवप्रिय: मनुष्य:' असे संबोधले आहे. उत्सवातून आनंद व्यक्त करता-करता आपण पुन्हा नव्या आनंदाला प्राप्त होत असतो. दरवर्षी संपन्न होणारे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' हाही एक उत्सवच आहे. 'मनोरंजन ते प्रबोधनापर्यंत'चा शब्दसंवाद घडविणाऱ्या या संमेलनाचा प्रवास शतकाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलाय. त्यानिमित्ताने या प्रवासाचे थोडे सिंहावलोकन व संमेलनाविषयी चिंतन करू या.*

नमस्कार वाचकहो,

आपल्या मराठी मातीला वाङ्मयीन सृजनाचा सोहळा साजरा करण्याची सुदीर्घ परंपरा आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची रुजवात होऊन दीडशे वर्षांचा काळ लोटलाय. आता तर या साहित्य सोहळ्यापासून प्रेरणा घेत विविध रूपांत आणि स्तरांवर साहित्य संमेलने भरत आहेत. अलीकडच्या काही वर्षांपासून विश्व मराठी संमेलन भरण्यासही सुरुवात झाली आहे.

सन १८७८ साली पुण्यात पहिले 'ग्रंथकार संमेलन' भरले. पारतंत्र्याचा तो काळ. ब्रिटिश राजवटीत आणि संस्थानी वातावरणात अशा प्रकारचे संमेलन भरवावे हा विचार वाङ्मयप्रेमी व समाजसुधारक असणाऱ्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या मनात येणे हे किती क्रांतिकारी होते! पहिल्या दोन संमेलनांनंतर तिसरे संमेलन भरायला तब्बल वीस वर्षांचा काळ लोटला. कालौघात संमेलनाचे रूपही बदलत गेले. चौथ्या संमेलनानंतर पुण्यात २७ मे १९०६ रोजी साहित्य परिषदेची स्थापना झाली आणि या साहित्य संस्थेने संमेलनाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. स्त्रियांचा प्रथमच सहभाग तसेच 'मराठी वाङ्मयात स्त्रियांची मदत' या महत्त्वपूर्ण निबंधाचे वाचन यांमुळे पाचवे साहित्य संमेलन अविस्मरणीय झाले. त्यानंतर अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या आयोजनातून संमेलनाला व्यापक रूप येत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साजरे करण्यास सुरुवात झाली. सन १९०९ मध्ये प्रथमच महाराष्ट्राबाहेर गुजरातमधील बडोदा शहरात सातवे संमेलन 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' या नावाने भरले व येथूनच

राष्ट्रीय स्तरावर संमेलन भरवण्याची प्रथा सुरू झाली. आजपर्यंतचा या संमेलनाचा इतिहास पाहता १८ संमेलने महाराष्ट्राबाहेर झाली आहेत.

हा संमेलनोत्सव शतक पूर्ण करत असला तरी यांत यापूर्वी केवळ कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, विजया राजाध्यक्ष, शान्ता शेळके, अरुणा ढेरे नि आता तारा भवाळकर अशा सहाच स्त्री साहित्यिकांना संमेलनाध्यक्ष पदाचा मान मिळाला आहे. त्यातही पहिली स्त्री संमेलनाध्यक्ष होण्यासही चार दशकांचा काळ लोटल्याचे आपल्या ध्यानात येते. संमेलनाचा आजवरचा इतिहास रोचक तर आहेच; पण सुजाण वाचकांना अंतर्मुख करायला लावणाराही आहे. त्यातील सर्वच बाबींचा येथे परामर्श घेणे शक्य नाही आणि तसा हेतूही नाही. उगमाशी प्रवाहाचं असलेलं रूप आणि आता पात्र विस्तारल्यावर त्याला प्राप्त झालेली खोली यांचा थोडक्यात मागोवा घेत, साहित्य संमेलनाची सार्थकता नेमकी कशात सामावलीय त्याचे चिंतन व्हावे असे मनात आहे.

अन्य भारतीय भाषांमध्ये वाङ्मयीन सोहळ्यांची एवढी दीर्घ परंपरा ऐकिवात नाही. निसर्गात वसंत फुलण्याआधीच दरवर्षी हा साहित्य - वसंत समाजात बहरून येतो. जानेवारी - फेब्रुवारी महिना सुरू झाला की आपल्याला साहित्य संमेलनाचे वेध लागतात. आताही हा अंक आपल्या हातात पडून आपण तो वाचेतो राजधानी दिल्लीत ९८व्या साहित्य संमेलनाचे पडघम वाजत असल्याचे आपल्या लक्षात येईल.

अलीकडे संमेलन सोहळे किमान तीन दिवसांचे तरी असतातच. त्यापूर्वी विभागीय साहित्य संमेलन होते. ग्रंथदिंडी, पुस्तक प्रदर्शन, विविध परिसंवाद, कवी संमेलने, मनोरंजक कार्यक्रम आदींनी संमेलन गाजते ; पण याहून महत्त्वाचे असते ते अध्यक्षीय भाषण. त्यातून साहित्यविषयक नवविचारांचे प्रकाशन व्हावे, उज्ज्वल वारसा आणि परंपरेचा मागोवा घेत असतानाच सद्य:स्थितीचे यथार्थ आकलन करून घेत, भाषेपुढील आव्हाने जाणून घेत, त्यासंबंधीची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊ शकेल अशी आणि व्यवहार्य सूत्रे मांडावीत; ' तुटे वाद संवाद तो हितकारी' या समर्थ उक्तीप्रमाणे श्रोत्यांशी / वाचकांशी संवाद घडावा असे वाटते. तसेच अशा संमेलनातून लेखन व्यवहारातली सखोलता व सूक्ष्मता, कलात्मकता व अलिप्तता जाणून घेण्यासाठी वाचकाची मनोभूमीही तयार व्हायला हवी. या दृष्टीने विचार करता संमेलनाध्यक्षांची भाषणे हा स्वतंत्र चिंतनाचा विषय होईल.

वर्धा येथे संपन्न झालेल्या ९६व्या अ.भा.म. साहित्य संमेलनातील न्या. नरेन्द्र चपळगावकर यांचे अध्यक्षीय भाषण हे कालजयी विचारांचे द्योतक आहेच; त्याशिवाय विद्रोही साहित्य संमेलनाला अचानक भेट देऊन त्यांनी 'साहित्याची अविभाज्यता व सायुज्यता' कृतीतून दर्शवली. काही दिवसांपूर्वीच आदरणीय न्या. नरेन्द्र चपळगावकर आपल्यातून निवर्तले. निसर्गक्रमाने व्यक्ती जाणारच; पण

मागे उरते ते त्याचे हे असे विचारसंचित. त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करीत असतानाच येथे त्यांच्या विचारांचे चिंतन करत त्या विचारांतील कालातीतता मांडावीशी वाटते. थोर तत्त्वज्ञ इसाया बर्लिन यांच्या 'अभावात्मक स्वातंत्र्य' व 'भावात्मक स्वातंत्र्य' या संकल्पनांचा चपळगावकर सरांनी मांडलेला मूलगामी विचार, भाषा व साहित्याच्या सद्य:स्थितीविषयीचे जाणते विचार, विवेकीवृत्तीचा त्यांनी केलेला पुरस्कार आदी बाबी आजच्या सामाजिक स्थितीत अधिकच कृतिशील आहेत. त्यांचे अध्यक्षीय भाषण सलगपणे वाचणे हा एक जाणीवपाठ आहे.

सूज्ञ वाचकहो, आज सामाजिक वास्तव डोळसपणाने अभ्यासणे अत्यावश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात मूल्यांची होत असलेली पडझड, असंवेदनशीलतेने घडत असलेल्या हिंसक घटना व त्यांचे सतत वाढतच चाललेले प्रमाण आपण निशीदिनी अनुभवतोय. या सर्व पार्श्वभूमीवर भाषेद्वारे मानवी मनावर करावयाचे जाणीवपूर्वक संस्कार कमी होत चालले आहेत काय? प्रतिभावंत लेखक, संवेदनशील वाचक यांचे मनोमिलन संमेलनातून घडते आहे काय? लिहिण्या-वाचण्याची ऊर्जा संमेलनातून मिळते काय? भौतिक प्रगती करणे गैर नाही; मात्र त्यासाठीचे मार्गदर्शन करण्यासाठीच आपली लेखणी झिजवणे कितपत योग्य आहे? मन आणि मेंदू सतत सजग राहून, संवेदनशीलतेने कृतिप्रवण करणारे अक्षर-वाङ्मय सदोदित व्यक्तिमनापुढे असू नये काय? एकीकडे वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न होत असतानाही प्रत्यक्षात माणूस किती वाचतो आहे? त्यातून स्वत:चे जीवित वाचवतो आहे, समाजमनाला वळण देतो आहे? या सर्व प्रश्नांचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. साहित्य संमेलन हे त्यासाठीचे उत्तम व्यासपीठ आहे. संमेलन साजरे करत असतानाच आपल्या जीवनाशी संगत असणाऱ्या या प्रश्नांचाही आपण विचार करू या.

उत्सव हवेतच. ते आनंददायीच आहेत. मात्र उत्सवाचा मूळ हेतू नि त्याचे वास्तव स्वरूप यांचा मेळ राखणे महत्त्वाचे आहे. 'मनाची दिवाळी' ही खूप मोठी गोष्ट आहे याचा विसर पडता कामा नये. या सर्व बाबींचा सामग्र्याने विचार करत दोन नवीन सदरांचा समावेश आता प्रस्तुत अंकात आपण केला आहे. जानेवारीच्या अंकापासून वाचकांच्या भेटीस आलेले 'अभिजात मराठीची अक्षरप्रभा' हे सदर आणि चालू अंकापासून सुरू झालेले 'वसा अक्षर चळवळीचा' ही ती सदरे होत. वाचक या नवीन सदरांचे स्वागत करतील अशी आशा आहे. त्यासोबतच साहित्य क्षेत्रातील भरीव कृतींनी समाजमन संतुलित राहण्यास हातभार लागेल ही आसही व्यक्त करते. आपण त्यासाठी शुभेच्छुक असूत. धन्यवाद.

**डॉ. प्रिया निघोजकर,** कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



अनुराग, प्रणय, विरह, रुसवा, वंचना, वात्सल्य, हर्ष, खेद... अनंत भावच्छटांना मूर्तरूप देणाऱ्या लताबाईंच्या निवडक गीतांच्या शब्द-सूर-अर्थासह असलेला हा आस्वादक परिचय. क्यूआर कोड स्कॅन करा आणि करा सुरांची सफर...

### साठवणीतली गाणी
### सुरांची सम्राज्ञी लता मंगेशकर

डॉ. मृदुला दाढे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

रफी म्हणजे स्वरसंगीतातील ऐट नि अदब. असंख्य भावच्छटा रफी-स्वरातून सहज उमटल्या. हे पुस्तक रफीच्या आवाजातल्या जादूचं रहस्य आहे. त्याच्या गाण्यांचं रसग्रहण आणि क्यूआर कोड स्कॅन करून गाणी ऐकण्याचा आनंदानुभव.

### साठवणीतली गाणी
### नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी

डॉ. मृदुला दाढे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)





संगीताचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे किशोर कुमार. व्यक्ती म्हणून खासियत, सिनेसृष्टीतील संघर्ष, निवडक गीतांचं रसग्रहण यांचं हे कलात्मक कथन. सोबतच क्यूआर कोड स्कॅन करून गाणं ऐकण्याची सुविधाही!

### साठवणीतली गाणी
### आवाजाचा अवलिया किशोर कुमार

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## हमरस्ता नाकारताना

*अलीकडच्या काळात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सरिता आवाड म्हणजे एकोणीसशे सत्तरच्या दशकात पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांची चरित्रे लिहिणाऱ्या कै. सुमती देवस्थळे यांची कन्या! 'हमरस्ता नाकारताना' हे पुस्तक म्हणजे लेखिकेने स्वत:च्या आणि पर्यायाने त्यांच्या आयुष्यातील जवळच्या व्यक्तींचा साकारलेला एक सूत्रबद्ध आणि बोधप्रद चरित्रपटच आहे.*

वडिलांच्या साठाव्या वर्षी (आणि आईच्या २८व्या वर्षी) सुमती जन्माला आली. शाळामास्तर वडिलांच्या निवृत्तीच्या वयात (मुलगी झाली हो..च्या अनवट चालीवर) जन्माला आलेली कन्या. त्यामुळे नेहमीच दुर्लक्षित होत गेलेली. सुमती हुशार असल्यामुळे तिला मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तम मार्क मिळाले व बीए करायला परवानगी मिळाली. परंतु त्या काळात मुलीचे शिक्षण सुमतीच्या आईला महत्त्वाचे न वाटल्याने सुमती इंटरला असतानाच तिचे लग्न ठरवले गेले. अगदी परस्परविरुद्ध स्वभावाच्या म्हणता येईल अशा ध्येयविहीन आणि एकमार्गी असलेल्या पदवीधर कऱ्हाडे ब्राह्मण माणसाशी तिचे लग्न लावले गेले. थोड्याफार पुढारलेल्या म्हणता येईल अशा माहेरच्या (पुण्याच्या) आणि जुनाट वळणाच्या सासरच्या (सोलापूर) वातावरणात नाही म्हटले तरी खूप फरक होता. सुमतीचे यजमान (अण्णा) फारसे महत्त्वाकांक्षी नव्हते. त्यामुळे आधीच धुमसत असलेल्या सुमतीच्या असंतोषात भर पडली. महत्त्वाकांक्षी सुमतीने कोषातून बाहेर पडून, पुढे बीए आणि एमए करून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले आणि तिच्यावर कळत नकळत लादल्या गेलेल्या प्रतिकूलतेला चांगलाच शह दिला. अर्थात प्रतिकूलता आणि सततचा संघर्ष असल्यामुळे शारीरिक आणि मानसिक ऱ्हास तर होतोच. सुमतीबाईंनी प्राध्यापकी करून कुटुंबाला आर्थिक हातभार तर लावलाच, पण ४०व्या वर्षी हृदयविकार होऊनही पुढील १४ वर्षांच्या आयुष्यात अनेक तत्त्ववेत्त्यांचे चरित्रग्रंथ लिहिले, जे साहित्यक्षेत्रात नावाजले गेले. सुमती देवस्थळे हे व्यक्तिमत्त्व बुद्धिमान, सहनशील, स्वाभिमानी, ध्येयशील, जिद्दी, कार्यशील, धडाडीचे, मनस्वी, अभ्यासू, तत्त्वनिष्ठ, शीघ्रकोपी, थोडेसे बहिर्मुख, ताठर (inflexible) तसेच वर्चस्व गाजविणारे असे होते.

## अभिनंदन! लोकमंगल साहित्य पुरस्कार समिती, सोलापूर



लोकमंगल राज्यस्तरीय
साहित्य पुरस्कार

**चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...**

चंद्रकांत कुलकर्णी



## अभिनंदन! मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



श्रीस्थानक राज्यस्तरीय
साहित्य पुरस्कार

**ओळख आपल्या विश्वाची**

डॉ. गिरीश पिंपळे



## अभिनंदन! सार्वजनिक वाचनालय, नाशिक



कविवर्य नारायण सुर्वे
साहित्य पुरस्कार

**अजान आणि चालिसा**

मुबारक शेख



आनुवंशिकतेने ह्यातील बरेचसे चांगले गुण त्यांच्या कन्येमध्ये उतरले, तर त्यात नवल ते काय..??

सरिता देवस्थळे ही SSCला नॅशनल मेरिट मिळविणारी हुशार विद्यार्थिनी, जन्मापासून आईशी खूप प्रेमाचे नाते असलेली मुलगी. लेखिकेने लिहिल्याप्रमाणे अगदी आईचा बहि:श्चर प्राणच!! तिच्या कॉलेजच्या दिवसांत मात्र आईच्या लेखनाच्या पसाऱ्यामुळे सरिताला आईचा सहवास आणि वेळ कमी मिळू लागला. मोठे कलाकार आणि साहित्यिक यांच्याकडून आपापल्या कुटुंबीयांवर थोडाफार अन्याय होतच असावा, कारण कला किंवा साहित्य जोपासायला आणि निर्मितिक्षमता वाढवायला त्या त्या प्रतिभवंताला प्रचंड वेळ द्यावा लागतो. आईच्या लेखनसंपदेविषयी सरितातार्इंना आदर तर होताच. जाणतेपणी त्यांनी आईच्या लेखनप्रेरणेविषयी थोडे अधिक खोलवर समजून घेतले आणि त्यांचा थोडा भ्रमनिरास झाला. आईला सर्वसामान्य व्यक्ती (क्लार्कची बायको) म्हणून जगायचे नव्हते, आणि म्हणून आई लिहीत होती, असे तिच्या लक्षात आले. हे सत्य सरिताच्या पचनी पडले नाही, परिणामी तिने आईचे लेखन वाचायचे सोडून दिले. (हे काही मला फार पटले नाही. सर्वसामान्य व्यक्ती म्हणून जगू नये असे पुष्कळ स्त्रियांना वाटते, पण ह्या कारणाने त्या काही कर्तृत्ववान बनत नाहीत. आईकडे मुळातच लेखनाचे स्फुलिंग होते, talent होता, ज्याला योग्य ते पोषण मिळाल्यावर ते अंकुरले आणि म्हणूनच ती उत्तम लिहू शकली). आईने फुले-आंबेडकर-सावरकर यांसारख्या एतद्देशीय थोरामोठ्यांवर न लिहिता टॉलस्टॉय, श्वाईट्झर, गॉर्की यांसारख्या पाश्चात्त्य व्यक्तींवरच फक्त का लिहिले असावे, याचे मानसशास्त्रीय विश्लेषण लेखिकेने पुस्तकात (पान ९२) वर केले आहे, ते वाचनीय आहे. ह्यावरून सरितातार्इंच्या बुद्धीची आणि परिपक्वतेचीही कल्पना येते. स्वत: लेखिकेचा पिंड हा थोरामोठ्यांच्या पुस्तकातून स्वत:चे भविष्य घडविण्यापेक्षा, वास्तवातून अनुभव घेऊन शिकण्याचा आहे. सामाजिक कार्यात त्यांना मिळणारे आईचे प्रोत्साहन v/s तिची (आईची) वास्तवातली प्रत्यक्ष कृती ह्यांमधील असलेला 'विरोधाभास' प्रामाणिक असलेल्या लेखिकेने अधोरेखित केला आहे, ज्यामुळे दोघींमधील विसंवाद अजून वाढला.

सरितातार्इंचा ओढा सामाजिक कार्यक्षेत्राकडे होता. त्यामुळे त्यांनी पदवी प्राप्त करता करताच ह्या संदर्भातील अनेक शिबिरे आणि चर्चा ह्यात रस घेतला. TISसारख्या सामाजिक संस्थांमध्ये पुढील शिक्षणही घेतले. यामुळे जगाकडे संवेदनशीलतेने आणि डोळसपणे बघण्याची सवय जडली. त्यांना स्त्री-चळवळीचेही आकर्षण निर्माण झाले. इतके, की पुढे हेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे निमंत्रणदेखील त्यांना आले. अशातच युक्रांदचा सक्रिय कार्यकर्ता असलेल्या (जातीने नवबौद्ध असलेल्या) तडफदार रमेशची ओळख झाली. सामाजिक

विषयांवरील वेगवेगळी शिबिरे आणि चर्चासत्रे यांमुळे ओळख अधिक वाढली. भेटीगाठी सुरू झाल्या. आयआयटीमध्ये शिकत असलेल्या रमेशची जडणघडण कशी होत गेली, हे बारकाईने निरखून रमेशच्या जोपासल्या गेलेल्या सवयी आणि मनात दृढ झालेल्या सामाजिक मूल्यांविषयी लेखिकेने बराच ऊहापोह केला आहे, जो ह्या पुस्तकाचा अत्यावश्यक भाग आहे. त्यांच्याच भाषेत लिहायचे, तर एका बाजूला आर्थिक अभाव आणि दुसऱ्या बाजूला मानसिक स्वास्थ्य असे रमेशचे बालपण होते. जन्मत:च हुशार असलेल्या आणि काही काळ ज्ञान प्रबोधिनीत घालविलेल्या रमेशचे उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचनही होते. प्रबोधिनीत आणि अन्यत्र (रमेशच्या जातीमुळे) so called उच्च वर्णीयांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक, यामुळे त्याच्यात विद्रोही प्रवृत्ती मूळ धरू लागली. आंबेडकरभक्त असलेल्या रमेशला दलित पँथरचे विचारही पटायचे. तो पूर्ण निरीश्वरवादी आणि भौतिकवादी होता. रमेशची पूर्ण प्रोफाइल मांडणे ह्या लेखात अशक्य आहे. (त्यासाठी पुस्तक वाचलेले बरे!) अशा बहुआयामी युवकाबद्दल वेड्या वयात लेखिकेला वाटणारे आकर्षण अगदीच अस्थायी नव्हते. पण चळवळीचे आकर्षण असलेल्या रमेशचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले. आयआयटीत मोठे अपयश आल्याने त्याला बँकेत नोकरी घ्यावी लागली. प्रचंड आर्थिक ओढाताण झाल्यामुळे उधारी घेण्यापर्यंत मजल गेली. तरीही लेखिका त्याच्या व्यक्तिमत्त्वात गुंतलेलीच राहिली. परिणामी, हे सर्व काही अजिबात मान्य नसलेल्या तिच्या आईपासून ती आणखी दुरावली.

रमेशवर प्रेम तर होतेच. पण जातीय विद्वेशाचे हिडीस दर्शन आणि वैयक्तिक विद्रोह ह्यांमुळे लेखिका रमेशशी लग्न करायला प्रवृत्त झाल्या, असे त्या प्रांजळपणे कबूल करतात. Reactive responses always lead to irrational decisions ह्याचे हे उदाहरण आहे. असे असले, तरी लेखिकेने मोठ्या जिद्दीने संसारातील आपली




तत्त्वांशी तडजोड न करण्याची सचोटी, मिंधेपणा अव्हेरणारा स्वाभिमान या बळावरच व्यवस्थेतील भ्रष्ट मानसिकतेविरुद्ध त्यांनी लढा दिला. ही भ्रष्ट मानसिकता कधी ना कधी नष्ट होईल, असा आशावाद जागवणारे आत्मकथन.

काळोखातून उजेडाकडे

भ्रष्टाचारी मानसिकतेशी लढा

लक्ष्मण कृष्णाजी पानसरे

किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ ५०)

भूमिका लागेल तिथे परिस्थितीशी संघर्ष करून उत्तमपणे निभावली. ह्या सगळ्या कठीण परिस्थितीत सरिताला नातेवाइकांची नाही, तर जोडलेल्या मित्रमैत्रिणींची प्रेमळ साथ लाभली हे विशेष! हे लग्न टिकविण्यासाठी त्यांची काहीही करण्याची तयारी होती. ह्याचे कारण रमेशवरील त्यांच्या निस्सीम प्रेमाबरोबरच त्यांना झालेली दोन छान अपत्येही असू शकते (कर्तव्यनिष्ठता). संसाराबरोबरच बाहेरील जगात लेखिकेला सामाजिक कार्यक्षेत्रातील महत्त्वाकांक्षादेखील होती. तिला स्वत:चे जग उभे करायचे होते! एका परीने सरिताच्या आईनेही स्वतंत्र स्त्रीचा अधिकार गाजवून स्वत:चे जग निर्माण केले. पण मुलीला मात्र वेगळे निकष लावून तसे करण्याचे स्वातंत्र्य दिले नाही. आत्मभान शाबूत ठेवणाऱ्या सरिताने ह्या विरोधाला झुगारून स्वत:च्या स्वप्नपूर्तीला महत्त्व दिले.

हे प्रांजळ आत्मकथन एक illustration म्हणून अभ्यासले, तर काही प्रश्न मनात निर्माण होतात.

स्त्री-अस्मितेचा पुरस्कार आणि अजूनही बहुसंख्य स्त्रियांना वाटणारे पुरुषप्रधानतेचे आकर्षण अशी दोन आंतरविरोधी तत्त्वे एकत्र आली, तर स्त्री-पुरुष समतेचे उद्दिष्ट तडीस जाईल का? ब्राह्मण मुलांमुलींनी आंतरजातीय विवाह करून जातिविषमतेचे निर्मूलन करता येईल का? 'शेवटी जर नवऱ्याने 'नवऱ्यासारखं'च वागायचं... तर आंतरजातीय विवाह कशाला करायचा..?' असं खुद्द लेखिका पान २४७वर म्हणते. जास्तीत जास्त लोकांनी आंतरजातीय विवाह केल्याने सकृतदर्शनी कदाचित जातीय विषमता दूर होईल, पण असमाधानी जोडप्यांचे पेव फुटून समाज दिशाहीन होईल का..?

कित्येक प्रसंगात रमेशच्या अविश्वासाचा तडाखा सरिताला बसला, ज्यामुळे ती मुळापासून हादरली आणि नाते कमकुवत बनले. संशय आणि राग ह्यांमध्ये ५-६ वर्षे गेली असे लेखिकेने लिहिले आहे. ह्यामुळे दोघांच्याही तब्येतीवर विपरीत


कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...




सीता

अभिराम भडकमकर

किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. ₹ ५०)

परिणाम झाला. तरीही सरिताने घटस्फोट घेतला नाही. एवढ्या बंडखोर स्त्रीला हे का नाही जमले? सहजीवनाची कल्पना रमेशला अगदी नसल्यासारखीच होती. तरीही सरिता त्याच्यावर प्रेम करीतच राहिली. असे का? एका अर्थी सरिताला नवराही दुरावला. ''माझं काय चुकलं?''... अशी तिची अवस्था झाली. कित्येक पारंपरिक उदात्त कल्पनांवर आणि तत्त्वांवर लेखिकेने बोट ठेवून वाचकांना विचार करायला भाग पाडले आहे.

आत्मपरीक्षण न केल्यामुळे रमेशमधील दोष तसेच राहिले. इतके सुंदर आत्मभान असणाऱ्या आणि counsellingचे ज्ञान असणाऱ्या सरिताला रमेशला मार्गावर आणता आले नाही ह्याचे आश्चर्य वाटते. लग्नाचे बंधन हे खूप गोष्टी सोप्या बनवते की कठीण? ह्याचे उत्तर 'कठीण' असे असेल, तर 'लिव्ह इन रिलेशनशिप' हे त्याचे उत्तर आहे का? जोडप्याच्या विशिष्ट वयातच ते सोयीचे आहे का? ते आनंददायी होण्यासाठी विशिष्ट मानसिक घडण अत्यावश्यक आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

ह्या पुस्तकात अनेक विषयांचे, वृत्तींचे वेगवेगळे पदर आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ध्येयपूर्तीकडे कशी वाटचाल करावी, तसेच आंतरजातीय विवाहांमधील संभाव्य धोके कुठले ह्याचे उत्तर विस्तृत स्वरूपात ह्या पुस्तकात मिळते. हे पुस्तक विशेष करून मुक्त जीवन जगण्याची अभिलाषा बाळगणाऱ्या आजकालच्या तरुण-तरुणींनी जरूर वाचले पाहिजे, असे वाटते. एका अप्रतिम पुस्तकाबद्दल सरितातार्इंचे मनापासून अभिनंदन आणि त्यांच्या पुढील कार्यसिद्धीसाठी शुभेच्छा!!

***विकास कात्रे***, ठाणे
९८३३६१०८७५



१९५५ साली जन्मलेल्या मुलीची ही आत्मकथा. मध्यमवर्गीय कुटुंब. विद्यार्थ्यांच्या आणि स्त्रियांच्या चळवळीतून तिची जडणघडण झाली. व्यक्तिगत पातळीवर पुरुषप्रधानतेचा संपूर्ण अभाव ते पुरुषप्रधानतेचा संपूर्ण प्रभाव असा हा जीवनप्रवास आहे. समतेच्या तत्त्वावरची अदम्य निष्ठा हा या कहाणीचा आत्मा आहे.

हमरस्ता नाकारताना

सरिता आवाड

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# वसा अक्षर चळवळीचा

'वाचाल तर वाचाल' हा मंत्र समाजाला कृतीतून दर्शविणाऱ्या समाजमाध्यमांवरील प्रेरक समूहांची माहिती

## वाचनव्रत : ३०+३

मी आणि माझी मालवणची मैत्रीण वैशाली पंडित यांनी व्हॉट्सॲपवर एक अभिवाचन समूह जुलै २०२३मध्ये सुरू केला. त्यावर्षी आलेल्या अधिक महिन्यात रोज वेगवेगळ्या लेखांचं वाचन करून त्याचा ऑडिओ व्हॉट्सॲपवर टाकायचा असा आमचा मानस होता. मग अधिक महिना, त्यातलं जावयाला दिलं जाणारं ३०+३ अनरशांचं वाण हा संदर्भ लक्षात घेऊन समूहाचं नाव ठेवलं - 'वाचनव्रत ३०+३'. त्यापुढचे ३३ दिवस सतत जुन्या मासिकातले, वर्तमानपत्रातले वेगवेगळे लेख वाचून त्याचे ऑडिओ टाकण्यात कसे संपले ते कळलंच नाही. त्या वेळी सभासदसंख्या २००पर्यंत गेली होती.

आमच्या अभिवाचनावर भरपूर अनुकूल प्रतिक्रिया आल्या आणि हे वाचनव्रत तसंच पुढे सुरू ठेवावं अशा विनंत्यादेखील. मग आम्ही त्यावर पुस्तकं वाचायचं ठरवलं. वैशाली पंडित ही स्वत: एक लेखिका आहे. त्यामुळे तिचं साहित्य तिनं वाचायचं ठरवलं. वाचनीय पुस्तकं आणि ती वाचायची परवानगी या दोन्ही बाबी माझ्या दृष्टीनं महत्त्वाच्या होत्या. मी अमेरिकेत असल्यानं पुस्तकं मिळणंही सोपं नव्हतं. मग सुरुवात केली ती डॉ. स्मिता दातार यांच्या 'व्हॉयोलिन सिंग्ज' या पुस्तकानं. त्यानंतर घेतलं सदाबहार 'स्मृतिचित्रे', त्यानंतर डॉ. उज्ज्वला दळवींचं 'सोन्याच्या धुराचे ठसके' मग राजहंसच्या विनया खडपेकर यांच्याशी संपर्क झाला आणि त्यांनी मला या समूहावर राजहंसची पुस्तकं वाचायची परवानगी मिळवून दिली. मग काय माझ्यापुढे भांडारच खुलं झालं. त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

अधूनमधून वैशाली तिच्या 'आगीनझाड' कथासंग्रहातल्या आणि इतर स्वत:च्या कथा, लेख वाचतच होती. तिचं गुरुचरित्र, बिरबलाची रेघ या सदरांचं सभासदांकडून खूपच कौतुक झालं. कुसुम अभ्यंकर यांची 'सोनबावरी' ही कादंबरी वैशालीनं वाचली. अभिराम भडकमकरांची 'सीता' कादंबरी, मेजर जनरल शशिकांत पित्रे यांचं 'दुर्दम्य', पार्वतीबाई आठवले यांची 'माझी कहाणी', डॉ. संदीप श्रोत्री यांचं 'इंकाची देवदरी', मृणालिनी चितळे यांच्या कथा या पुस्तकांचं वाचन मी करू शकले. सध्या

‘ज्याचं त्याचं एव्हरेस्ट’ या पुस्तकाचं वाचन चालू आहे.

‘विवाह नाकारताना’ या विनया खडपेकर यांच्या पुस्तकावर तर पुण्यातल्या काही भगिनींनी राजहंसच्या ऑफिसात एकत्र येऊन त्यावर विनयाताईंशी चर्चा केली. याशिवाय डॉ. शरद वर्दे यांचं ‘फिरंगढंग’, डॉ. बाळ फोंडके यांचं ‘ऑफ लाईन’, डॉ. मनोज भाटवडेकर यांचं ‘एका पुनर्जन्माची कथा’, गणेश कुलकर्णींचं ‘रुळानुबंध’ ही पुस्तकंही आजवर वाचून झाली आहेत.

या वाचनचळवळीनं अगदी सहज एक आकार घेतलाय. अभिवाचनाचं प्रत्येक पुस्तक संपलं, की त्यावर प्रतिक्रियांसाठी समूह दोनतीन दिवस खुला केला जातो. श्रोत्यांच्या भरपूर प्रतिक्रिया येतात. काहींचे फोनही येतात. या प्रतिक्रिया मी संबधित लेखकाला पाठवते. खूपच प्रेरक आहे ही सारी प्रक्रिया. ही काही त्याची बोलकी उदाहरणंच पाहा न...

- ‘मी सध्या पलंगावर झोपूनच आहे. वाचायचीही ताकद नाही. या ग्रुपमध्ये सामील झाले आणि माझ्या आनंदाचा दरवाजा उघडला. त्यावर आलेले ऑडिओ मी परत परत ऐकते. चांगल्या पुस्तकांची मेजवानी मिळते.’ सांगायचं म्हणजे या समूहात अनेक सदस्य ज्येष्ठ नागरिक आहेत. ते म्हणतात, ‘वाचायची खूप आवड आहे, पण आता तासभर वाचणंही शक्य होत नाही. कुणीतरी वाचून दाखवलं तर बरं वाटतं. त्यामुळे हा ग्रुप आम्हाला वरदान वाटतो. शिवाय दिवसभरात केव्हाही ऐकावं. काही कारणाने जमलं नाही तर नंतरही ऐकता येतं.’
- ‘स्मृतिचित्रे हे पुस्तक खूप पूर्वी वाचलेलं होतं. पण तरीही ते ऐकताना त्यातल्या अनेक अनेक प्रसंगातली मजा पुन्हा घेता आली.’
- ‘दुर्दम्य’ या मेजर जनरल शशिकांत पित्रे यांचं पुस्तक ऐकून मी अक्षरश: भारावून गेले. आमच्या घरातील दोन व्यक्ती नेव्ही आणि आर्मीमध्ये काम करतात. प्रत्येक नागरिकानं ते वाचलंच पाहिजे. म्हणजे आपले सेनानी आपल्यासाठी तळहातावर


आपल्या अनवट अशा नाटकांनी मराठीच नव्हे तर भारतीय रंगभूमीला वेगळं वळण देणारे प्रख्यात नाटककार सतीश आळेकर यांनी आपल्या रंगभूमीवरील कारकिर्दीचा आणि आपल्या नाट्यकृतींचा उलगडलेला अनोखा प्रवास -

**गगनिका**

सतीश आळेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. ₹ ५०)

शीर घेऊन कसे लढतात ते कळेल. हे पुस्तक ऐकल्यावर ते विकत घेऊन मी अनेकांना भेट म्हणून दिलं.

'लख्ख, निष्पक्ष विचार आणि सडेतोड मांडणी ह्यांमुळे 'विवाह नाकारताना' हे आत्मकथन अनेकांना मार्गदर्शक ठरणारं आहे. कधी कधी एखादे पुस्तक वाचून आपल्या विचारप्रक्रियेला एक वेगळा आणि उपयुक्त असा कंगोरा मिळतो तसे हे पुस्तक आहे. लग्न करण्यास इच्छुक असणाऱ्या परंतु काही कारणाने अविवाहित राहावे लागणाऱ्या मध्यमवर्गीय उच्चशिक्षित आणि स्वत:च्या पायावर उभ्या असणाऱ्या महिलांनी जरूर वाचावं.'

'रुळानुबंध' या पुस्तकावरील प्रतिक्रिया तर अगदी विलक्षण आहे. ती अशी : 'आम्हीही रेल्वे परिवारातील सदस्य आहोत. माझे यजमान भुसावळला रनिंग शेड, कार शेड, MOH शेड येथे इंजिनीयर म्हणून कार्यरत होते. आता यजमान नाहीत. असते तर त्यांना तुमच्या पुस्तक अभिवाचनाने फारच आनंद मिळाला असता. फारच सुंदर लिखाण केले आहे तुम्ही. तुमच्या या जगातील अनुभव तुमच्या लिखाणातून अनुभवायला मिळाले. एखादी व्यक्ती रोजच्या रुक्ष कामातूनही मनात असले तर किती विविध प्रकारे सभोवतालच्या वातावरणातील आनंद घेऊ शकते हे शिकायला मिळाले. आपल्या देशाच्या प्रगतीतील एक वेगळा अनुभव आपण मांडला आहे. शेकडो माणसांच्या जीवनाची जबाबदारी घेत, असंख्य टेक्निकल गोष्टी सांभाळत डोळ्यांत तेल घालून अशी भलीमोठी गाडी चालवणं म्हणजे खायची गोष्ट नव्हे हे या पुस्तकातून छानपैकी समजलं आणि रेल्वे प्रशासन सगळी व्यवस्था नीटपणे चालावी यासाठी किती काळजी घेते हेही जाणवलं.' 'पुनर्जन्माची कहाणी'विषयी एक श्रोता लिहिते की, 'मलाही ऱ्हुमॅटॉईड आर्थरायटीसचा त्रास आहे, आपल्या पुस्तकामुळे मलाही एक नवा मार्ग मिळाला.'

अशा प्रकारे प्रत्येक वाचनानंतर येणाऱ्या प्रतिक्रिया खूपच आश्वासक आहेत. वाचनातून माणसाचं मन चौफेर विचार करू लागतं, मोकळं होतं, व्यापक होतं याचा अनुभव आम्ही या समूहाच्या माध्यमातून घेत आहोत.

आजमितीला या समूहाचे ८९४ सभासद आहेत. अशीच नवनवी पुस्तकं आम्हाला मिळावीत आणि त्यांचा श्रवणानंद जाणत्या श्रोत्यांना देण्याची संधी आम्हाला मिळावी हीच सदिच्छा.

धन्यवाद.

***वसुंधरा पर्वते***, अमेरिका
संपर्क. क्र. +१ (६१४) ७९०-०९६१

अभिनंदन!

गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिक यांच्यातर्फे
निळू फुले वाङ्मय पुरस्कार व
'मराठी वाङ्मय परिषद', बडोदे यांच्यातर्फे
'आत्मकथन/आत्मचरित्र' प्रकारात प्रथम पारितोषिक



**दौशाड**

◆

डॉ. नंदकुमार राऊत




अभिनंदन!

गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिक



निळू फुले वाङ्मय
पुरस्कार

**सवाष्ण**

◆

डॉ. क्षमा गोवर्धने-शेलार




अभिनंदन!

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई



लक्षवेधक पुस्तक
२०२४

**माझे शाळेतले प्रयोग**

◆

स्मिता गौड



# अभिजात मराठीची अक्षरप्रभा

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे अंशरूपाने वाचकांसमोर ठेवणारे हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

*माझ्या मराठीचि बोलु कौतुकें ।*
*परी अमृतातेंही पैजा जिंके ।*
*ऐसी अक्षरें रसिके । मेळवीन ॥*

(श्री ज्ञानेश्वरी, ६.१४)

मराठी भाषेचं माधुर्य, रससौंदर्य माउलींनी प्रस्तुत ओवीतून अगदी यथार्थपणे व्यक्त केले आहे. मराठी भाषेतील शब्दांचे, वाणीचे आणि रससौंदर्याचे अनोखे वर्णन संत ज्ञानेश्वर करतात. या भाषेच्या माध्यमातून अनुभूतीचा अमृतानुभव देतात. शब्द हा केवळ श्रवणाचा विषय नसून संपूर्ण विश्वाचा अनुभव देण्याची शक्ती त्यात सामावलेली आहे हेही माउली सांगतात.

विनम्रता आणि आत्मविश्वास या एकाच खणखणीत नाण्याच्या दोन बाजू आहेत. या नाण्याचे नाव आहे निर्भयता. ज्ञानातून उपजणारी निर्भयता. भगवद्गीता निर्भयतेलाच सर्व सद्‌गुणांचे अग्रस्थान देते. ज्ञानी व्यक्ती सर्वार्थाने निर्भय असल्यामुळे सर्वांशी समभावाने वागते. तिच्या प्रत्येक कृतीत आत्मविश्वासाचे व विनम्रतेचे दर्शन घडते. ज्ञानेश्वर माउली हे ज्ञानियांचे राजे होते. साहजिकच आत्मविश्वास आणि विनम्रता हे त्यांचे स्थायिभाव होते. यातूनच त्यांनी सर्वांच्या जीवन-विकासासाठी चिरंतन शब्दसृष्टी असलेला 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ निर्माण केला. नवनवोन्मेषशालिनी, स्वयंभू, वैश्विक मूल्यभान जपणारी अशी ही श्रेष्ठ साहित्यकृती आहे. मराठी भाषेचे सौंदर्य यात ठायी ठायी जाणवते.

ज्ञानेश्वरांचे भाषावैभव अशा तोलामोलाचे होते की, त्यांच्या मुखावाटे बाहेर पडणाऱ्या शब्दाला चपखल अर्थ चिकटत होता. 'अर्थ बोलाची वाट पाहत' हात जोडून उभा होता. त्यांना जनसामान्यांच्या जीवनप्रवाहाशी मिसळून त्यांच्याशी त्यांच्या बोलीतच जिवाभावाचे हितगूज करायचे होते. म्हणूनच त्यांनी गीतेचा मराठीत भावानुवाद करून अवघे विश्व धवळले.

सर्व समाजाने एवढ्या बालवयात त्यांना माउली पद बहाल केले. शतकानुशतके लक्षावधी लोकांची ही माउली त्यांचे भावविश्व समृद्ध करून त्यांचा स्वानंदकेंद्राकडे जाण्याचा मार्ग उजळीत आहे.

गीतेचा भावार्थ मराठीतून विवरताना ज्ञानेशांना कोणतीही न्यूनता वाटली नाही. याउलट, मराठीच्या सुपीक भूमीत 'साहित्य सोनियाच्या खाणी' उघडून सर्व स्तरांवर 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' करीत सर्वांना स्वानंदसाम्राज्याचे नागरिक बनवण्यासाठी त्यांचा प्रेमभाव उदित झाला. 'स्वानंदसाम्राज्य' हा त्यांचा शब्दच सर्व काही सांगून जातो. त्यांच्या अशा अनेक प्रतीतीच्या बोलांतून मराठी भाषा समृद्ध झाली आहे. अमृतालाही लीलया जिंकणाऱ्या भावमधुर शब्दांत त्यांनी गीतेचा भावार्थ मराठी भाषेत सांगितला. 'देशियेचेनि नागरपणें' (१०.४२) या त्यांच्या मार्मिक शब्दांतून त्यांचा मराठी भाषेविषयीचा अभिमान प्रकट झाला आहे. फुलांची वाट पाहावी न लागताच जसा चंदनाच्या वृक्षाचा स्वाभाविक सुगंध रसिकाला आल्हाद देतो, तशा ज्ञानदेवींच्या ओव्या केवळ आंगिक नादमाधुर्याने ऐकणाऱ्याला तल्लीन करतात. इतकेच नव्हे, तर जिवाभावाने त्याच ऐकत राहावेसे वाटते.

आपल्या वेल्हाळ देशी भाषेतील वाग्विलासातून शांत रसाचा आविष्कार करत ज्ञानेशांनी जगाभोवती गीतार्थाचे आनंदाचे आवार उभारले. गीतेचा भावार्थ उमजून सर्वांची 'स्व'रूपाशी भेट व्हावी, सर्वांच्या जीवनात सुखाचा सोहळा उजळावा आणि सर्वत्र स्वानंदाचा सुकाळ व्हावा हेच त्यांचे हृद्गत होते.

मनाला मंत्रमुग्ध करणाऱ्या व चित्ताला वेध लावणाऱ्या या भावस्पर्शी शब्दांतील रस चाखण्यात बाह्य इंद्रियांचीही आपापसांत स्पर्धा लागेल- 'इंद्रियां लागे कळंभा, एकमेकां' (६.१६) असे ते नि:शंकपणे म्हणतात. शब्द हा कानांचा विषय असूनही जिभेला तो आपलाच रस वाटेल आणि सुवासाचीच अनुभूती घेऊ शकणाऱ्या नासिकेला हे शब्द सुगंधित वाटतील. या शब्दसौंदर्याच्या मोहिनीने डोळ्यांपुढे रूपाची खाण उघडून त्यांचे पारणे फिटेल. शब्दांच्या हळुवार पदन्यासाने सर्वांगावर रोमांच उमटतील व पदपूर्तीनंतर खुद्द मनच शब्दांना आलिंगन द्यायला बेहोशीने बाहू पसरील! आपापल्या स्थायिभावांनी इंद्रिये शब्दांना अशी लगटून राहतील. ज्ञानेश्वरीच्या वाचकांना ज्ञानेशांच्या या शब्दसामर्थ्याची कल्पना येते.

ज्ञानेश शब्दसृष्टीचे ईश्वर होते; पण त्यांना केवळ शब्दसौंदर्याचे व साहित्यालंकाराचे फाजील स्तोम मान्य नव्हते. त्या शब्दांतून ओसंडणारा, मनाला

स्थिरावणारा रसभावच त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. लावण्यसंपन्न व गुणसंपन्न स्त्री पतिव्रताही असण्यात जसे उन्नत स्त्री-जीवनाचे गुह्य साठवलेले असते, तसे शब्दसौंदर्य व साहित्यालंकार यांनी नटलेल्या काव्याचे वैभवी विदग्ध रसातून उमलणाऱ्या भावविश्वात केंद्रित झालेले असते. ज्याच्या मुग्ध सौंदर्यावरून इतर आठही रस ओवाळून टाकावेत तो अंतरंगाचा विसावा असणारा शांत रस त्यांना प्रिय होता. म्हणूनच शांत रसाचा परिपोष करणारे ‘समुद्राहुनि सखोल’ असे ‘अर्थभरित’ शब्द त्यांच्या तोंडून सहजगत्या उमटले.

*तो शांतुचि अभिनवेल ।*
*ते परियसां मऱ्हाटे बोल ।*
*जे समुद्राहुनि सखोल । अर्थभरित ॥*

अशा गहिऱ्या शब्दांच्या संथ लयीने ज्ञानेश्वरीचे बहिरंगही रसिकाला मंत्रमुग्ध करून सोडते.

मराठी भाषेचे ‘असाधारण व्यापकपण’ अशा रितीने या अजोड ग्रंथाच्या रूपाने सदोदित आपल्याला साथसंगत करील आणि आपले जीवित उजळवेल.

*(संदर्भ : ज्ञानेश्वरीचे भावविश्व - मो. रा. गुण्ये, स्नेहल प्रकाशन, पुणे)*

❖


आजच्या धकाधकीच्या जीवनात मनाला शांतता आणि
समाधान मिळवून देणारं, कृष्णाच्या दैवी रूपापल्याड नेऊन
त्याची कालातीत शिकवण देणारं आणि
प्राचीन परंपरा-वाङ्मयाबद्दल डोळसपण जागवणारं
हे संवादात्मक शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णन.




नंदीघोष-यात्रा
श्रीकृष्णकथा : वेध नवा

सतीश मुटाटकर, यशवंत मराठे
अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा




अल्पायुषी ठरूनही रसिकांच्या मनावर आजही गारूड करणाऱ्या गुरुदत्तवरील ‘चरित्र-कादंबरी-जीवनप्रवास’ अशा संमिश्र घाटाचा, त्याच्या चरित्रातील नव्या पैलूंवर प्रकाश टाकणारा हा ऐवज.

### प्यासा

सुधीर नांदगावकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)




शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं. यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी! यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

### अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)



कवितेवर प्रेम करणाऱ्या एका कविमनाचा कवितेसोबतचाच हा भावविभोर करणारा, तर कधी अंतर्मुख करणारा प्रवास. ‘माझी कविता माझ्यासाठी’ असं म्हणणाऱ्या या मनस्वी कवीची कविता वाचता-वाचता कधी आपली होऊन जाते हा अनुभव घ्यायलाच हवा!

### दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता

दत्तप्रसाद दाभोळकर

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## पाकिस्तान का मतलब क्या?

*इस्लामी चेहऱ्याच्या पेचात आणि भारतविरोधाच्या चक्रव्यूहात फसलेल्या पाकिस्तानचा आजवरच्या प्रवासाचा वेध 'पाकिस्तान का मतलब क्या?' या पुस्तकात घेण्यात आला आहे. पाकिस्तानी लेखकांच्या, विचारवंतांच्या आणि नेत्यांच्या ग्रंथांचा आधार त्यासाठी घेण्यात आला आहे. पाकिस्तान हा देश 'ॲबनॉर्मल' का आहे आणि त्याचे भवितव्य कसे असेल, हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.*

हिंदू आणि मुसलमान हे दोन वेगळे देश आहेत, असा सिद्धान्त मांडून पाकिस्तानची मागणी ब्रिटिशांकडे करण्यात आली आणि ती मिळवलीही गेली. ब्रिटिश राजवटीच्या शेवटच्या कालखंडात पाकिस्तानसाठी मुस्लीम लीगची चळवळ सुरू असताना, तिला सतत एक प्रश्न विचारला जात असे. तो म्हणजे : 'पाकिस्तान का मतलब क्या?'

आज पाकिस्तानची निर्मिती होऊन ७७ वर्षे झाल्यानंतरही तिथे हाच प्रश्न विचारला जातो. तो नेत्यांच्या सभांमध्ये उपस्थित केला जातो, चर्चात्मक कार्यक्रमांत मांडला जातो आणि तिथल्या अनेक शहरांतील भिंतींवरही रंगविला जातो. 'पाकिस्तान का मतलब क्या?' हा प्रश्न आणि 'ला इलाह इल्लल्लाह' हे त्यावरील उत्तर ही पाकिस्तानसाठीची घोषणाच झाली आहे.

पाऊणशतकी वाटचाल केल्यानंतरही आपल्या देशाचा अर्थ काय, आपल्या अस्तित्वाचा आधार कोणता, आपली अस्मिता कशात आहे, हे प्रश्न पाकिस्तानला सतावत आहेत आणि त्यांच्या उत्तरांच्या शोधात तो दोनच मुद्द्यांवर येऊन ठेपतो. ते म्हणजे : धर्म आणि भारतविरोध. वांशिक, सांस्कृतिक आणि भाषिक विविधता असलेल्या पाकिस्तानला धर्माचा म्हणजे इस्लामचा धागा एकसंध ठेवतो, अशी




किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

समजूत पक्की करून तेथील राज्यकर्त्यांनी इस्लाममध्येच पाकिस्तानची अस्मिता शोधली. यामुळे मूलतत्त्ववाद्यांना पोषक वातावरण मिळाले. इस्लामी ओळख दृढ करण्यासाठी या मूलतत्त्ववाद्यांनी मध्ययुगीन काळातील नीती-नियमांचा आग्रह धरला. यातून पाकिस्तान अधिक कट्टर होत गेला.

सोव्हिएत संघाने अफगाणिस्तानात फौजा घुसविल्यानंतर तेथील मुजाहिदीनांच्या लढ्यात भूमिका बजावण्याची संधी पाकिस्तानला मिळाली. त्यात पाकिस्तानला सामरिक हितसंबंध दिसत होते हे खरे, परंतु यामुळे तिथे कट्टरपंथीयांचा जोर वाढत गेला. मलेशिया किंवा तुर्की यांसारख्या विकासाभिमुख मुस्लीम देशांचा आदर्श समोर ठेवणाऱ्या पाकिस्तानसमोर पेच निर्माण झाला, तो इस्लामी चेहऱ्याचा. इस्लामी; परंतु सुधारणावादी आणि प्रगतिशील देश बनायचे की इस्लामी कायदे पाळणारा देश व्हायचे, या प्रश्नातून त्याची अद्याप सुटका झालेली नाही. मात्र, मूलतत्त्ववाद्यांचे पालनपोषण केल्याने, जनरल झियांच्या राजवटीतील व्यापक इस्लामीकरणामुळे त्याची वाटचाल कट्टरपंथीय होण्याच्या दिशेने वेगाने होत आहे.

इस्लामी अस्मिता ठळक केल्यानंतरही 'पाकिस्तानी म्हणजे कोण?' हा प्रश्न उरतोच; कारण जगात अनेक इस्लामी देश आहेत. पाकिस्तान ज्या भूभागात साकारला, तिथे सिंधू संस्कृतीची पाळेमुळे आहेत. हडप्पा, मोहेंजेदडो ही सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली ठिकाणे पाकिस्तानात आहेत. तक्षशिला विद्यापीठ जिथे होते, तो भागही तिथेच आहे. पाकिस्तानला खरे तर या साऱ्यांचा वारसा सांगता आला असता; पण तसे केले तर आपण आणि भारत यांत फरकच उरणार नाही आणि त्यामुळे आपले वेगळे होण्याचे प्रयोजनही राहणार नाही, असे वाटून पाकिस्तानने हा वारसा नाकारला. जे-जे भारतीय ते-ते नाकारण्याचे धोरण त्याने स्वीकारले. इस्लाम पाकिस्तानला एकसंध ठेवतो हे खरे असले, तरीही बांगलादेश (पूर्व पाकिस्तान) पाकिस्तानपासून वेगळा झाला. त्यामुळे आपल्याला एकसंध ठेवण्यासाठी भारतविरोधही आवश्यक असल्याची खूणगाठ तेथील राज्यकर्त्यांनी, तिथे सर्वशक्तिमान असलेल्या लष्कराने बांधली. अशा रितीने भारतविरोधही पाकिस्तानच्या अस्तित्वासाठीचा आवश्यक घटक बनला.

मुस्लीम हे वेगळे राष्ट्र आहेत, असा युक्तिवाद यशस्वी करून देशाची निर्मिती करणारे बॅ. महंमद अली जीना हे तिथले सर्वांत मोठे नायक. पण, आपली इस्लामी अस्मिता अधोरेखित करण्यासाठी पाकिस्तानने अरबी आणि अफगाणी आक्रमकांत आपले महानायक शोधले. इ.स. ७१२मध्ये सिंधवर आक्रमण करून तेथील राजा दाहिर याचा पराभव करणारा अरब आक्रमक महंमद बिन कासिम याला तेथील धुरीणांनी पहिला पाकिस्तानी ठरवले. गझनीचा महमूद, महंमद घोरी यांनाही पाकिस्तानने आपले नायक बनविले. यांपैकी कोणीही पाकिस्तान ज्या भूभागात आहे, तेथील नव्हते. या आक्रमकांनी भारतावरील आक्रमणात त्या त्या वेळी यश मिळवले,

हे यामागचे कारण. इस्लामी अस्मिता अधोरेखित होत असतानाच भारतविरोधही तीव्र होत असल्याने पाकिस्तानने या गोष्टी जाणीवपूर्वक केल्या.

अस्मिता आणि अस्तित्व यांसाठी इस्लामी चेहरा आणि भारतविरोध ठळक करण्यावर पाकिस्तानने जसा भर दिला, तसा भर देशाच्या उभारणीवर कधीच दिला नाही. पाकिस्तानची अर्थव्यवस्था कशी असेल, तिथे उद्योग कसे उभारले जातील आदींबाबतच्या प्रश्नांना जीनांनी नेहमीच उडवाउडवीची उत्तरे दिली होती. प्रत्यक्ष पाकिस्तान साकारल्यावर या प्रश्नांना सामोरे जाण्याची वेळ आली, त्या वेळी त्यांच्याकडे कोणता आराखडा नव्हता. पाकिस्तानचे सामरिक स्थान हे तत्कालीन सोव्हिएत संघाला रोखण्यासाठी महत्त्वाचे असल्याने, अमेरिकेने आणि त्याच्या मित्र देशांनी आपल्याला मदत करावी, अशी भूमिका त्यांनी घेतली. थोडक्यात, आपल्या भू-राजकीय स्थानाद्वारे आर्थिक लाभ मिळविण्याचे हे धोरण होते. सोव्हिएत संघाच्या विरोधातील आणि नंतर तालिबानच्या विरोधातील अफगाणिस्तानामधील युद्धांतील पाकिस्तानच्या सहभागामागचे प्रमुख कारण हेही होते. आपली सामरिक खोली वाढविण्यासाठी अफगाणिस्तानचा उपयोग करणे, हेही एक कारण आहेच.

ही युद्धे, कट्टरपंथीयांसाठी पोषकता, 'पाकिस्तान स्टडीज' या विषयाद्वारे शिक्षणातून इस्लामी अस्मिता आणि भारतद्वेष यांचं बीजारोपण, पाकिस्तान या संकल्पनेचे आणि त्याच्या भौगोलिक क्षेत्राचे आपण एकमेव संरक्षक आहोत ही लष्कराची भावना यांमुळे पाकिस्तानचे रूपांतर कडव्या धार्मिक आणि लष्करी देशात होत गेले. शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग आदींद्वारे देशाची पायाभरणी करण्याची दूरदृष्टी तिथे पुरेशी दाखवली गेली नाही. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर, हा देश

भारताचा कडवा द्वेष किंवा इस्लामबद्दलचे कर्मठ प्रेम
यांपैकी कशाभोवतीही पाकिस्तानचे राष्ट्रजीवन
धड उभे राहू शकलेले नाही. आपल्या अस्तित्वाचा मूलाधार
या देशाला इतक्या वर्षांत सापडलेला नाही.
अराजकाच्या भोवऱ्यात सापडलेल्या आपल्या
शेजाऱ्याची ही शोकात्म फजिती किती धोकादायक
ठरू शकते, हे सप्रमाण दाखवून देणारे
लक्षवेधी पुस्तक.




पाकिस्तान... अस्मितेच्या शोधात

प्रतिभा रानडे

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

सर्वधर्मीयांसाठी असेल, असे जीनांनी म्हटले असले, तरी मुस्लिमांसाठी पाकिस्तान - अशी मांडणी त्यांनी स्वत:च केली असल्याने, तो देश कधीच सेक्युलर होऊ शकला नाही. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर जेमतेम वर्षानंतर जीनांचा मृत्यू झाला. त्यामुळे देशाला आकार देण्याइतपत वेळही त्यांना मिळाला नाही. त्यांच्या पश्चात आलेल्या नेत्यांकडेही आधुनिक आणि प्रगतिशील पाकिस्तानबाबतची दृष्टी नव्हती. त्यामुळे इस्लामी अस्मितेला गोंजारतच त्यांनी वाटचाल केली.

पाकिस्तान निर्माण झाला, तेव्हा लष्कर ही एकमेव संस्था तिथे भक्कम अवस्थेत होती; कारण देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत अधिक आकारातील लष्कर पाकिस्तानच्या वाट्याला आले होते. त्यामुळे पहिल्या दिवसापासून लष्कराने देशावर पकड मिळविली. पाकिस्तान चळवळीतील नेत्यांनी स्वातंत्र्यापूर्वी संस्थात्मक उभारणीवर फारसा भर दिला नव्हता. देश निर्माण झाल्यावर राष्ट्रीय राजधानीत कार्यालये निर्माण करण्यापासून निर्वासितांच्या पुनर्वसनापर्यंतची कामे लष्कराकडे आली. जीना आणि काही प्रमाणात तेथील पहिले पंतप्रधान लियाकत अली यांचा अपवाद वगळता कोणताही नेता मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय नव्हता. त्यामुळे तेथील व्यवस्थेवर पकड घट्ट करणे लष्कराला सोपे गेले. तेथील लष्करशाहीची बीजे या सुरुवातीच्या काळातच रोवली गेली. प्रमाणापेक्षा अधिक असलेला आपला आकार कायम ठेवण्यासाठी आणि आपले महत्त्व अधोरेखित करण्यासाठी लष्करानं भारतविरोधी आक्रमकता कायम ठेवली. भारत आपले अस्तित्व मिटविण्याच्या प्रयत्नात असल्याचा भयगंड तिथे जाणीवपूर्वक निर्माण केला गेला. काश्मीरला फाळणीचा अपुरा विषय ठरवून भारताच्या विरोधात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष युद्धे लढली गेली.

इस्लामी चेहऱ्याच्या पेचात आणि भारतविरोधाच्या चक्रव्यूहात फसलेल्या पाकिस्तानचा आजवरच्या प्रवासाचा वेध 'पाकिस्तान का मतलब क्या?' या पुस्तकात घेण्यात आला आहे. मुख्य म्हणजे पाकिस्तानी विचारवंत आणि सर्वसामान्य या प्रवासाकडे कसे पाहतात, याचाही वेध घेण्यात आला आहे. म्हणूनच पाकिस्तानी लेखकांच्या, विचारवंतांच्या आणि नेत्यांच्या ग्रंथांचा आधार या पुस्तकासाठी घेण्यात आला आहे. पाकिस्तान हा देश 'ॲबनॉर्मल' का आहे आणि त्याचे भवितव्य कसे असेल, हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.



***श्रीधर लोणी***

# आठवणींचा पारिजात

## 'गोट्या' मालिका : एक भाग्ययोग

सन १९८८च्या नोव्हेंबरमध्ये एका दुपारी खुद्द राजदत्तजींचा मला फोन आला. ''लगेच मुंबईला या. (तेव्हा ते मला 'अहो' म्हणायचे.) एक चांगली भूमिका आहे.'' नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. 'पुढचं पाऊल' चित्रपटाच्या नंतर मी त्यांना विनंती केली होती की मला त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची इच्छा आहे. तेव्हा ते मला म्हणाले होते, ''योग्य वेळ आली की दार ठोठावेन.'' ते शब्दाला जागले होते.

अभिनय कारकिर्दीच्या सुरुवातीलाच इतक्या अधिकारी, अनुभवी, अभ्यासू दिग्दर्शकानं आपणहून मला बोलवावं हा माझा सन्मानच होता. 'पुढचं पाऊल'मध्ये त्यांच्या दिग्दर्शनात काम करतानाचा अनुभव अतिशय हृद्य होता. शिकायला तर मिळालंच, पण माणूस म्हणूनही ते किती खरोखरच 'मायाळू' आहेत याचाही प्रत्यय मला आला. एक अभिनेत्री आणि दिग्दर्शक म्हणूनही आमचे सूर चांगले जुळले. राजदत्तजींनी एका मुलाखतीत माझ्याबद्दल गौरवोद्गार काढले होते की, 'काही थोडे कलाकार असे असतात की त्यांना दिग्दर्शकांनी सांगायच्या आधीच त्याच्या मनातलं कळलेलं असतं.' अशा कलाकारांच्यात त्यांनी माझा समावेश करावा ही बाब माझ्यासारख्या उदयोन्मुख अभिनेत्रीसाठी कोणत्याही पुरस्कारापेक्षा महत्त्वाची होती. त्यामुळेच राजदत्तजींचा फोन आल्यावर अतिशय आनंदात मी मुंबईला पोहोचले.

ना. धों. ताम्हणकर यांच्या 'गोट्या आणि चिंगी' या कादंबरीवर आधारित 'गोट्या' ही दूरदर्शन मालिका करायचं ठरलं होतं. गोट्या या अनाथ आणि काका - काकूंच्या छळाला कंटाळलेल्या गोड मुलाला एक सद्गृहस्थ आपल्या घरी घेऊन येतात आणि ते व त्यांच्या पत्नी गोट्याला अतिशय प्रेमाने स्वीकारून त्याचा मायेने सांभाळ करतात असं कथानक होतं. मुंबईजवळच्या मढ आयलँडमध्ये कोकणातलं वाटावं अशा एका घरात चित्रीकरण होणार होतं. तिथे बोटीनं खाडी पार करून जावं लागायचं. गंमत वाटायची. ते घर जुन्या बांधणीचं होतं. पुढे-मागे खरोखरच कोकणातल्यासारखी असंख्य दाट झाडी होती. फारच रम्य ठिकाण होतं ते. आम्ही पहिल्या दिवसापासूनच तिथे रमलो. आता मढ आयलँड गजबजलंय. पण तेव्हा तिथे अतिशय शांतता होती. जवळच समुद्र होता. सुतारवाडी या नावानं ओळखला जाणाऱ्या त्या परिसरात आमचं मुख्य घर आणि आसपासच्या अनेक ठिकाणी म्हणजे चर्च, शाळा, पिठाची गिरणी, दुकान अशा वेगवेगळ्या जागी चित्रीकरण झालं.

वसंत सबनीस, नंतर विठ्ठल वाघ, शिरीष गोपाळ देशपांडे यांनी अगदी सहज वाटतील असे प्रसंग आणि संवाद लिहिले होते. गोट्याची भूमिका प्रसिद्ध चित्रपट निर्माते गिरीश घाणेकर यांचा मुलगा जॉय घाणेकर करत होता. तर त्याचे वडील ही भूमिका जळगावचे गुणी कलाकार भैय्या उपासनी करत होते. आमची एक मुलगी सुमा ही भूमिका संपदा जोशी करत होती. याशिवाय मनोरमा वागळेंसारख्या ज्येष्ठ अभिनेत्रीबरोबर अनेक छोटे-मोठे कलाकार होते.

राजदत्तजी अतिशय खुबीनं सगळ्यांकडून काम करवून घेत. त्यांची कामाची पद्धतच इतकी साधी - सहज होती की कोणालाच दडपण यायचं नाही. आपण अभिनय करतोय असं वाटायचं नाही. त्यामुळे काही गंभीर, काही गमतीशीर, काही भावनिक असे प्रसंग फारच प्रभावी झाले आणि गोट्या मालिका लोकप्रिय झाली.

तेव्हा फक्त दूरदर्शनच होतं आणि मालिकाही आठवड्यातून एकदाच दाखवली जायची. त्यामुळे लोक त्या दिवसाची, त्या वेळेची आतुरतेनं वाट पाहू लागले. त्यावेळच्या दूरदर्शनच्या नियमाप्रमाणे मालिका प्रेक्षकांना आवडली, तर १३च्या पटीत भाग वाढवले जायचे. गोट्या मालिकेचेही १३ चे २६ आणि मग ३९पर्यंत भाग वाढवले. पण ३३व्या भागानंतर राजदत्तजी म्हणाले, ''आता आणखी पाणी घालणं शक्य नाही.'' हल्लीच्या मालिकांची मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढणारी लांबी बघता त्यावेळचं दत्ताजींचं हे म्हणणं आश्चर्यकारक होतं. पण अत्यंत प्रामाणिक, कलेशी इमान राखणारं, नि:स्पृह असं होतं. अशी तडजोड न केल्यामुळे गोट्या मालिकेचा दर्जा, सौंदर्य अबाधित राहिलं. म्हणूनच आजही ती मालिका प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिली आहे.

माझे सहकलाकार भैय्या उपासनी यांना विठ्ठल वाघ, कुसुमाग्रज, ना. धों. महानोर यांच्या अनेक कविता मुखोद्गत होत्या. कामानिमित्त अनेक लोकांशी परिचय असल्यामुळे आणि स्वभाव बोलका असल्यामुळे त्यांच्याजवळ किश्शांचा खजिनाच होता. मीही अनेक जुनी भावगीतं, सिनेगीतं गात असे. आमचं काम नसेल त्या वेळी पारावर बसून आमची मैफल रंगायची. त्यामुळे वेळ कसा जायचा ते कळायचंच नाही. अनेक उत्तम कविता, मोठ्या व्यक्तींबद्दलची माहिती या गोष्टींमुळे आयुष्य समृद्ध झालं. अगदी अविस्मरणीय असा तो काळ होता.

दत्ताजींना आमच्या मैफिलीत सामील होता यायचं नाही म्हणून वाईट वाटायचं, पण माझा गाण्याचा गुण लक्षात ठेवून त्यांनी मालिकेत एका अतिशय भावनिक प्रसंगात अंगाईगीत गाण्याची संधी मला दिली. चालही मीच लावली. तो प्रसंग अगदी हृदयस्पर्शी झाला. एकूणच तेव्हा मालिका हा प्रकार नवीन होता. मालिकेमुळे अचानक मिळालेली प्रसिद्धी, पैसे यांमुळे कुणी हुरळून गेलं नाही. कुणाशी स्पर्धा नव्हती. हेवेदावे नव्हते. दत्ताजींसारख्या शिस्तप्रिय पण तितक्याच प्रेमळ व्यक्तीमुळे गोट्याचा पूर्ण संघ हा खरोखरच एक कुटुंब बनला होता. इतका की शेवटी शिकण्यासाठी

गोट्या गाव सोडून शहरात जायला निघतो, त्या वेळी त्याला निरोप देण्याच्या प्रसंगी सगळे अक्षरश: रडले. शूटिंग संपलंय आणि आता उद्यापासून कोणी भेटणार नाही, हे रम्य ठिकाण पुन्हा दिसणार नाही या भावनेनं सगळे व्याकूळ झाले होते.

आपल्या संस्कृतीत आई या संकल्पनेला खूप महत्त्व आहे. मुलाची सर्वांगीण जडणघडण आईनं करणं अशी अपेक्षा त्या संकल्पनेत आहे. त्यानुसार गोट्याची आई ही आंधळं प्रेम करणारी, अतिलाडानं मुलाला बिघडवणारी नाही; तर त्याच्या संपूर्ण आयुष्याच्या दृष्टीनं त्याचं हित जपणारी, त्यासाठी प्रसंगी कठोर होणारी आहे. ती एक परिपूर्ण आईची भूमिका होती. त्यामुळेच ती प्रेक्षकांना नुसतीच आवडली नाही तर मनापासून पटली. कायमची लक्षात राहिली. सामान्य प्रेक्षकांकडून तर मला गेली ३५-३६ वर्षं ही पावती मिळतेच आहे; पण जेव्हा जयश्री गडकर या ज्येष्ठ अभिनेत्रीनं मला या भूमिकेबद्दल 'तुझा हेवा वाटला' असं म्हटलं, तेव्हा मी भरून पावले.

कोणत्याही कलाकाराला स्वत:ला सिद्ध करण्यासाठी विविधांगी भूमिका करण्याची संधी मिळावी असं वाटत असतं. माझ्या बाबतीत असं झालं की, मी 'गोट्याची आई' ही एक सात्त्विक, शालीन, प्रेमळ अशी भूमिका केल्यामुळे माझ्यावर तसाच शिक्का बसला. नंतर अनेक भूमिका करूनही आजसुद्धा लोक मला 'गोट्याची आई' म्हणूनच ओळखतात. कधीकधी थोडी खंत वाटते; पण आपली एखादी भूमिका इतकी प्रभावी होणं, आपली तीच ओळख होणं हीसुद्धा अभिमानाचीच गोष्ट आहे. त्या दृष्टीनं 'गोट्या' मालिका हा माझ्या आयुष्यातला भाग्ययोगच आहे.


***डॉ. मानसी मागीकर***

९८५११२२५८८



अभिनंदन!

कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक



अठरावा

जनस्थान पुरस्कार

◆

डॉ. सतीश आळेकर

## ‘राजहंसी’ विविधा




जनजीवनाशी अतूटपणे एकरूप झालेल्या या वस्त्रधाग्यांच्या मोहक प्रतिमा साहित्याच्या कथाकाव्यातून, चित्र-शिल्पांच्या रंगरेषांमधूनही उमटल्या. एका हुन्नरी कलाकाराने, व्यासंगी अभ्यासकाने आणि जाणकार तज्ज्ञाने विविधांगांनी घेतलेला एका वस्त्रसंस्कृतीचा वेध...

### वस्त्रगाथा

विनय नारकर

किंमत : ₹ ९००/- । (ट.ख. ₹ ५०)

हिंदुत्व परिवार व मार्क्सवादी परिवार शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा, कार्याचा तसेच गेल्या १०० वर्षांतील भारताचे समाजकारण आणि राजकारण यांच्यावर झालेल्या त्यांच्या परिणामांचा तटस्थ व निष्पक्षपाती भूमिकेतून घेतलेला हा मागोवा.

### हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत

विजय आपटे

किंमत : ₹ १०००/- । (ट.ख. ₹ ५०)







फ्रांझ काफ्का हा विसाव्या शतकातील महत्त्वाचा लेखक. त्याचा जीवनपट आणि त्याचे लेखन, ‘मेटॅमॉर्फोसिस’चे आस्वादक विश्लेषण, त्याच्याशी नाते सांगणाऱ्या साहित्यकृतींचा परामर्श यांचा समावेश असलेले पुस्तक.

### काफ्काचं ‘मेटॅमॉर्फोसिस’

न संपणारं गारूड

डॉ. सुहास भास्कर जोशी

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## माझी एकुलती

माझी ही काळी डायरी
पानांनी भरली आता...
खूपशा कहाण्यांनी...
काही ओल्या चित्रांनी...
काही संध्याकाळी न गायलेल्या गीतांनी..

काही ओथंबलेल्या पावसाच्या
काही वाहून गेलेल्या
काही बांध घातलेल्या....!
काही बांध फुटलेल्या...
प्रवाहासोबत... प्रवाहाविरुद्ध...
एक आध्यात्मिक प्रवास!

गाणी भिजलेल्या पावसाची...
डोक्यावरून ओघळणाऱ्या धारा...
गालावरचे अनमोल मोती...
सरीवर कोसळणाऱ्या सरी
संगम... आभाळाच्या मायेचा...
आणि मातीमधल्या आशेचा...!

काळ्या खडकांवर
विध्वंसक... कोरीव... आवेगाने
आदळणाऱ्या लाटांच्या
कधी न जिंकलेल्या...
चढाया-लढाया...
पराभूत योद्ध्याच्या पराक्रमाची अदृश्य कहाणी...!

आश्वस्त, खांद्यावर झुकणारी...
कोवळी, मुलायम हिरवी
लडिवाळ गुंतल्या केशी...
निष्पाप, दाटल्या छायेमधली
सलगीने गालाचा मुका घेणारी
अबोल, गुलाबी, उमलती कळी...

काही ओली निसर्गचित्रं
निळ्या नवलाईत दडलेल्या
आकाशात विहरणाऱ्या पक्षिणी..
मावळता सूर्य.. पसरता अंधार

भरतीच्या समुद्राच्या लाटा,
कानावर स्याक्सोफोन चे सूर!

कधी डोकावतं... मोरपीस..
मधल्या पानी, खुणेसाठी
खोचलेलं... कधी एक
पाकळी गुलाबाची....
गुदगुल्या करणाऱ्या
वेड्या साहसाची... आठवण....!

कधी सूर उमटतात
निसर्गात सामावणारे
शूद्ध संपूर्ण यमन कल्याण..!
शूद्ध भावना, शूद्ध स्वरांच्या
केवळ एक... मध्यम तीव्र
बाकी सगळे एका बाजूला!

***राजीवलोचन पुंडलीक***
९९२३७५६६४८


माणसात लपलेल्या हिंस्रतेचे अनेकविध पदर
उलगडून दाखवणारा, त्याच्यातल्या माणूसपणाचेही
दर्शन घडवणारा कवितासंग्रह

युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)





निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या काटेरी अनुभवाला
आलेले करुणेचे फूल या कवितांना साद घालते.
कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली
सत्याची भाषा आहे.

व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

# उद्‌गार

नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

## शह आणि काटशह : वैद्यकीय व्यवसायातील चुरस

*न्यायव्यवस्थेतील सर्वांनी, वैद्यकीय शिक्षणाचा रस्ता घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांनी, शिक्षणाशी संबंधित सर्वांनी आणि मुख्य म्हणजे विवेकबुद्धी जागरूक ठेवणाऱ्या प्रत्येकाने वाचायलाच हवे असे हे पुस्तक...*

## वैद्यकीय प्रवेशाचे ‘काळे’ प्रकरण

पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेशामुळे महाराष्ट्रातले एक मुख्यमंत्री राजीनामा देऊन घरी गेले, हे सगळ्यांना माहीत असते. मात्र एखाद्या डीनच्या मुलाच्या प्रवेशासाठी संपूर्ण व्यवस्था दावणीला बांधली गेली तरी तो मुलगा अयोग्य पद्धतीत प्रवेश घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करून वैद्यकीय व्यवसाय करायला लागतो, कोणताही ठपका न ठेवला जाता डीन त्यांचा कार्यकाल पूर्ण करतात आणि हे सारे पुण्याच्या बी. जे. महाविद्यालयात घडते, तेही सुमारे ३५ वर्षांपूर्वी. हा अनाकलनीय प्रकार या पुस्तकात वाचून आपण चकित होतो. नुकतीच घडलेली ललित पाटीलची घटना सगळ्यांना आठवते, पोर्शे गाडीच्या अपघातात ससूनचे वाभाडे काढले गेले, पण वैद्यकीय शिक्षणपद्धतीतील प्रवेशाच्या पळवाटा न्यायव्यवस्थेच्या मान्यतेच्या शिक्कामोर्तबानिशी कशा घडत गेल्या, याची खरीखुरी नावानिशी चित्तरकथा पुण्यातील बालरोगतज्ज्ञ डॉ. राजीव जोशी यांनी लिहिली आहे. राजहंस प्रकाशनाने ती ‘शह आणि काटशह’ या नावाने प्रसिद्ध केली आहे.

७ जानेवारी १९८७ला सुरू झालेली ही कथा १६ मार्च १९८९ला उच्च न्यायालयामध्ये घडलेले शह आणि काटशह संपवून अर्धविराम घेते. न्याय झाला असे वाटत असताना सरकारी व्यवस्थेद्वारा डीन सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करतात. तिथे पोहोचणे व खर्च करणे डॉ. जोशी यांना शक्य न झाल्यामुळे व्यवस्था पुन्हा एकतर्फी अपिलातून जिंकते.

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील

विद्यार्थी त्या काळात आपल्याच कॉलेजमध्ये प्रवेश घेत. सर्वोच्च न्यायालयाने हा नियम घालून दिलेला असताना तो धुडकावून आंबेजोगाईच्या कॉलेजमधून एमबीबीएस झालेला बी. जे. मेडिकलच्या डीनचा मुलगा पुण्याच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतो. घेतो, म्हणण्यापेक्षा मागील दाराने त्याच्या प्रवेशाची कथा सुरू होते. जागा भरलेल्या असल्याने सात वर्षांआधीचा बॅकलॉग दाखवून प्रवेश होतो. यामध्ये विभागप्रमुख, कॉलेजचे डीन, पुणे विद्यापीठाची वैद्यकीय पदव्यांना मान्यता असल्यामुळे तिथली व्यवस्था यांची अनोखी हातमिळवणी सुरू होते.

डॉ. जोशींना स्वत:च्या बालरोगतज्ज्ञ शाखेतील पदव्युत्तर प्रवेशाच्या वेळी आलेल्या अनुभवातून ही लढाई कशी असते, याचा अनुभव आलेला असल्याने या दुसऱ्या लढाईमध्ये ते उतरतात. त्यांच्या स्वत:च्या प्रवेशाचे वेळी २७ गुण कमी असलेल्या मुलीला त्यांना डावलून प्रवेश दिला गेला होता. असाच नियमबाह्य प्रकार डीनच्या मुलाचे संदर्भात घडताना पाहून नैतिक बळावर ते लढायला सुरुवात करतात, मात्र असे लक्षात येते की व्यवस्थेतील सगळी साखळी घट्टपणे विरोधात जाणाऱ्याला नामोहरम करण्यासाठी पटकन एकत्र येते. पदवी देणारे पुणे विद्यापीठ, प्रवेश देणारे बी. जे. मेडिकल कॉलेज, तेथील विभागप्रमुख यांची तक्रारदाराशी झुंज सुरू होते. ही हातमिळवणी इतकी घट्ट असते की एकमेकांना उच्च न्यायालयात एकेकाने दिलेल्या वकिलांच्या द्वारे पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन करणाऱ्या राजीव जोशी यांना विविध पद्धतींत निंदानालस्तीला सामोरे जावे लागते. हा खेळ जसजसा रंगू लागतो, तेव्हा उच्च न्यायालयाचे एक न्यायमूर्तीसुद्धा त्यात भर घालताना पाहायला मिळतात; तेव्हा मात्र वाचक थक्क होतो. त्यांचेकडून, 'डॉ. जोशी तुमची पदवी काढून घेईन. बालरोगतज्ज्ञ सोडाच, पण डॉक्टर म्हणूनसुद्धा तुम्हाला काम करता येणार नाही, अशी व्यवस्था मी करेन.' अशी भाषा भर न्यायालयात वकिलांच्या देखत डॉक्टर





लोन फ्रॉड, एटीएम क्लोन, ऑनलाइन गेमिंग, घसघशीत उत्पन्नाची लालूच दाखवणारे प्रीपेड टास्क, फिशिंग... एक ना दोन, अनेक प्रकारच्या फसवणुकी. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक मुखवट्याआडचा भेसूर चेहरा दाखवणारे- सायबर गुन्ह्यांबाबत सर्वांना सतर्क बनवणारे -

## सायबर अ‍ॅटॅक

डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

जोशींना ऐकायला मिळाल्यानंतर होणारा कोर्ट डायलेमा व मुख्य न्यायमूर्तींकडे केले गेलेले यावरचे अर्ज हे मुळातूनच वाचण्याजोगे आहे. डॉ. जोशींची वकील मैत्रीण आणि त्यांचा जवळचा वकील मित्र हे न्यायालयाचा अवमान होईल म्हणून जेव्हा बाजू मांडताना पड घेतात, तेव्हा डॉ. जोशी स्वत: केस लढवायला सुरुवात करतात. त्या वेळी मुख्य न्यायमूर्तींबरोबर झालेले संवादही अंगावर काटा आणतात. घरातून वडिलांचा व इतर मित्रांचा याला विरोध असतोच. एक उल्लेख भावनिक आहे. ज्या ज्या वेळी जोशींना मुंबईला उच्च न्यायालयात जाण्याची वेळ येते, तेव्हा त्यांचे वडील हातखर्चासाठी शंभर रुपये काढून हाती ठेवतात. त्या काळी ती मोठी रक्कम होती. हा झाला पुस्तकाचा दुसरा भाग.

'वैद्यकीय व्यवसायातील चुरस' पहिला भाग अशा छोट्या लेखांनी सुरू होतो. तीस छोटे लेख रंजक पद्धतीतील गेल्या ३० वर्षांतील वैद्यकीय व्यवसायावर प्रकाशझोत टाकतात. त्यातील अनुभव वाचकांना नवीन वाटतील असे आहेत. त्यांतून अनेक रुग्ण बनलेले वाचक बोध घेऊ शकतील, हे नक्की. डॉ. राजीव जोशी यांची शैली संवादरूपी आहे. पुस्तकाची निर्मितिमूल्ये राजहंसच्या परंपरेला शोभणारी आहेत. पुस्तकाचे संपादन सर्जन सदानंद बोरसे यांनी तितक्याच कौशल्याने केल्याचे जाणवते. मुखपृष्ठ अतिशय बोलके व मजकुराला पूरक आहे. ते पाहूनच वाचकाची उत्सुकता चाळवली जावी. न्यायव्यवस्थेतील सर्वांनी, वैद्यकीय शिक्षणाचा रस्ता घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांनी, शिक्षणाशी संबंधित सर्वांनी आणि मुख्य म्हणजे विवेकबुद्धी जागरूक ठेवणाऱ्या प्रत्येक वाचकाने वाचायलाच हवे, असे हे पुस्तक आहे.

***डॉ. श्रीराम गीत***

(*महाराष्ट्र टाइम्स, 'संवाद' पुरवणी,* २८ डिसेंबर २०२४मधून साभार)


एका आघातातून विस्कटलेल्या आयुष्याची घडी बसवण्याच्या प्रवासाचे हे एक वस्तुनिष्ठ वर्णन आणि दर्शन आहे.

- डॉ. मोहन आगाशे

*प्रख्यात मनोविकारतज्ज्ञ*



फिनिक्स

एक आत्मशोध

धनंजय गोडबोले । डॉ. मेघा देऊसकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा




टिळक, गांधी, नेहरू, वल्लभभाई, सुभाषचंद्र आणि राजाजी...
काळ जसा समजून घ्यावा लागतो, तसे त्या काळाला
कलाटणी देणारी माणसेही समजून घ्यावी लागतात,
यासाठी वाचावे असे पुस्तक...

### त्यांना समजून घेताना...

नरेन्द्र चपळगावकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मराठवाड्यात जन्मलेल्या, लहानाचा मोठा झालेल्या
एका संवेदनशील वाङ्मय-अभ्यासकाची ही कहाणी.
त्याची एकट्याची नाही, तर मराठवाड्याची अन्
तिथल्या माणसांची कहाणी. लेखकाच्या निमित्तानं
साकारलेली त्याच्या जगाची ही कहाणी.

### लोभस

एक गाव - काही माणसं

सुधीर रसाळ

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)







आपल्या विचारांचे, लेखनाचे आणि वाचनस्वातंत्र्याचे रक्षण
जागरूकपणे आपणच करावयाचे असते. ही जागरूकता
जपण्यासाठी विचार करणाऱ्या प्रत्येक सुजाण व्यक्तीने
आवर्जून वाचलेच पाहिजे, असे पुस्तक.

### साहित्य आणि स्वातंत्र्य

नरेन्द्र चपळगावकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

## ।। श्रद्धांजली ।।

*न्यायमूर्ती (नि.) नरेन्द्र चपळगावकर यांचे दि. २५ जानेवारी, २०२५ रोजी दुःखद निधन झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवारातर्फे नरेन्द्र चपळगावकर यांना आदरांजली!*
*'त्यांना समजून घेताना', 'साहित्य आणि स्वातंत्र्य', 'महात्मा आणि भारतीय राज्यघटना' तसेच 'लोकशाही आणि हुकुमशाही' ही न्या. चपळगावकर यांची ग्रंथसंपदा राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित झाली आहे.*
*न्या. चपळगावकर यांच्या कन्या भक्ती तसेच डॉ. सदानंद बोरसे, दिलीप माजगावकर यांनी श्रद्धांजलीपर लिहिलेले लेख येथे प्रकाशित करत आहोत.*

---

## प्रकाशाच्या विझण्याशी झगडत राहा...

Do not go gentle into that good night
Old age should burn and rave at close of day;
Rage, rage against the dying of the light.

*शीतल असली म्हणून काय झाले, रात्रीत हळूहळू विरू नकोस*
*दिवस संपत आला म्हणून काय झाले,*
*वार्धक्याच्या आगीत तळपत त्याला सामोरे जा*
*प्रकाशाच्या विझण्याशी झगडत राहा, झगडत राहा*

मृत्यूच्या समीप पोहोचलेल्या आपल्या पित्याला उद्देशून डिलन थॉमस या कवीने ही कविता लिहिली. बाबा आजारी पडल्यापासून मी ज्या अवस्थेत आहे, त्या अवस्थेची आर्तता व्यक्त करताना सतत मी त्याच्याच शब्दांचा आधार घेत आहे.


न्या. (नि) नरेन्द्र चपळगावकर

पंधरा एक दिवसांपूर्वी बाबांना हॉस्पिटल मध्ये नेण्याच्या आधी मी त्यांच्याशी बोलत होते. त्यांनी माझा हात हातात घेतला आणि म्हणाले, 'एक सांगू मृत्युमुळे फरक पडत नाही...' ते इतके दमले होते की एखादे वाक्यही त्यांना पूर्ण बोलता येत नसे... काही

क्षण थांबून म्हणाले, ‘म्हणजे तो वर्षभराने आला किंवा तीन वर्षांनी आला... तरीही तसा फरक पडत नाही’, मी हसत हसत त्यांना म्हणाले, तुम्हाला नसेल, आम्हांला पडतो ना बाबा. त्यावर त्यांच्या सुंदर राखाडी डोळ्यांवरच्या भुवया उंचावत त्यांनी होकारार्थी मान हलवली आणि म्हणाले, ‘ते बरोबर आहे. माणूस गेल्यानंतर त्याच्या आजूबाजूच्या लोकांना फार फरक पडतो’.

दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणाले, ‘तुम्ही तिघी बहिणी सुस्थितीत आहात. तुम्ही एक ट्रस्ट स्थापन केला पाहिजे आणि त्यातून तुम्ही ग्रंथालय वाचवण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. एक काम करा, तुम्ही मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला मदत करा’. मी जोरात हसत हसत म्हणाले, ‘उगाच जुन्या इमारतींना गिलावा देण्याचे काम मी करणार नाही’. मी कधीच त्यांचे म्हणणे ऐकले नाही. त्याचे त्यांना कौतुकच. मी तिघीतली तिसरी मुलगी, माझ्यानंतर भाऊ. धाकट्या मुलीला काहीही बोलण्याची परवानगी होती. तसा विचार केला तर घरातल्या प्रत्येकाला ती परवानगी होती. कदाचित यामुळेच असेल पण त्यांच्या आजारपणाच्या काळात आणि ते मृत्यूच्या समीप आले आहेत हे लक्षात आल्यानंतरही आमच्यातला संवाद सुरू होता. ते बोलत होते, आम्ही ऐकत होतो, बऱ्याचवेळा काहीतरी विनोद करून त्यांचे म्हणणे ऐकलेच नाही असे दाखवत होतो. त्यांनी सतत आम्हांला ते गेल्यानंतरच्या आयुष्याची जाणीव करून दिली. मी विनोद करून, त्यांचे म्हणणे ऐकून न ऐकल्यासारखे करून ती जाणीव करूनच घ्यायची नाही असे ठरवले.

बाबा निदान पंच्याण्णव वर्षे जगतील अशी आम्हांलाच नाही तर त्यांनाही खात्री होती. याचे कारण त्यांच्या घराण्यातले दीर्घायुष्य. माझे आजोबा सत्त्याण्णवव्या वर्षी तर आजी त्र्याण्णवव्या वर्षी गेली. आपण निदान नव्वद वर्षांचे होईपर्यंत लिखाण करत राहू असे त्यांना वाटे. मी जेव्हा माझ्या मृत्यूबद्दल किंवा मी किती वर्षे जगणार आहे याचा विचार करते तेव्हा मी त्या वेळी माझ्या मुलांचे वय किती असेल, ते सेटल झाले असतील का वगैरे विचार करते. त्यांचा विचार पुस्तकांच्याबद्दल असे. आजारपण वाढल्यानंतर त्यांना पुस्तके उचलता येईनात किंवा संदर्भग्रंथ जमा करता येईनात तेव्हा त्यांना सर्वांत महत्त्वाची काळजी वाटायला लागली ती म्हणजे, ‘मला आता वल्लभभाई पटेलांचे चरित्र लिहिता येणार नाही’. ‘पंतप्रधान नेहरू’ या पुस्तकानंतर त्यांना वल्लभभाईंचे चरित्र लिहायचे होते. हैदराबाद संस्थानाला भारतात सामील करून आपल्याला स्वातंत्र्य दिल्याबद्दल त्यांना वल्लभभाईंबद्दल कमालीची आस्था होती. पण आपल्याला जे जमणार नाही ते स्वीकारायची क्षमताही त्यांच्यात होती, त्यामुळे त्यांनी तो प्रकल्प अतिशय शांतपणे रद्द केला.

‘पंतप्रधान नेहरू’ या पुस्तकाच्या निमित्ताने २०२२ सालच्या अखेरीस गोखले अर्थशास्त्र-राज्यशास्त्र संस्थेत त्यांचे एक भाषण आयोजित करण्यात आले होते. याच काळात ते वर्धा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याची घोषणाही झाली होती. बाबांचे भाषण नेहमीप्रमाणे उत्तम झाले. माझ्याबरोबर ते माझ्या पुण्याजवळच्या घरी मुक्कामाला आले होते. त्यांच्या पाठीत प्रचंड वेदना होत होत्या. ते कधीही मी आजारी आहे किंवा खूप त्रासात आहे असे म्हणत नसत.

काही दिवसांनी लक्षात आले तोपर्यंत त्यांचा प्रोस्टेट कॅन्सर पाठीच्या हाडांत पोहोचला होता. प्रोस्टेट कॅन्सरवरील उपचार हा प्रश्न नव्हता, पाठीच्या हाडात पोचलेला संसर्ग हाच काळजीचा विषय होता. बाबांवरील उपचार सुरू झाले. अनेक दशकांपासून बाबांचे मित्र असलेले डॉ. एस. पी. एकबोटे, ऑकोलॉजिस्ट अभिनव झंवर, ऑँको-रेडियोलजिस्ट डॉ. प्रथमेश आणि डॉ. मुक्ता जोशी आणि कमलनयन बजाज हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी या काळात बाबांच्या, बाबांच्या म्हणण्यापेक्षा सतत आमच्याबरोबर होते.

पहिल्या दिवसापासून बाबांनी मेघनाला (माझी बहीण मेघना पाटील) सांगितले, आजाराबद्दल कोणतीही बाब माझ्यापासून लपवायची नाही. मी परिपूर्ण आयुष्य जगलो आहे. ज्या उपचारांनी त्याला अडथळा होईल असे काहीही करायचे नाही. मला जास्त जगण्यापेक्षा चांगले जगायचे आहे. याच विचारातून त्यांनी संमेलनाच्या आधी कॅन्सरवर शस्त्रक्रिया न करण्याचा निर्णय घेतला. संमेलनात मला बोलायचे आहे, संमेलनाध्यक्षाचे भाषण हे मराठी साहित्यविश्वासाठी महत्त्वाचे असते. ते लिहिताना मला सर्वव्यापी विचार करावा लागणार आहे. तुम्हीही माझ्याशी चर्चा करा असे त्यांनी सुचवले. साहित्यक्षेत्राची फारशी माहिती नसलेले आम्ही सर्वजण, पण त्यांनी कधीही कुणालाही कमी लेखले नाही. प्रस्तावित भाषणातील काही मुद्द्यांबद्दल त्यांचे अजयबरोबर (अजय भाळवणकर, माझा नवरा) मतभेद झाले. त्यांनी इतक्या उत्साहाने त्याची मते ऐकली की अजयला त्याचा मुद्दा पटवून देण्यासाठी काहीच वाद घालावा लागला नाही. नव्यांची मते ऐकणे त्यांना फार आवडे. अनेकदा त्यांना मते पटतही.

साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाला त्यांना वर्ध्याला कसे न्यायचे याबद्दल आमच्या कुटुंबात सतत चर्चा होत होती. त्यांच्या आजाराची चर्चा त्यांना अजिबात नको होती म्हणून आम्ही त्याबद्दल सुरुवातीपासूनच मौन बाळगले होते. त्यांच्या पाठीतल्या संसर्गामुळे त्यांना फार वेळ उभे राहणे, चालणे त्रासाचे होते. समृद्धी महामार्ग तुम्हाला प्रवासासाठीच बनवण्यात आला आहे असे आम्ही विनोदाने म्हणालो. प्रवास छानच झाला. गेल्या पन्नास साठ वर्षांतल्या अनेक संमेलनातल्या आठवणी त्यांनी मला सांगितल्या. वर्ध्यात महात्मा गांधी

आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय आहे, त्याच्या फादर कामिल बुल्के निवासात आम्ही राहिलो. हा परिसर फार सुंदर होता. आमच्याबरोबर बापुकाका (डॉ. सुधीर रसाळ), मावळते संमेलनाध्यक्ष भारत सासणे यांचीही व्यवस्था होती. संमेलनात त्यांचे भाषण वेगळ्या सत्रात होते. त्यांना राजकारण्यांच्या आधी स्टेजवर जावे लागले आणि राजकारणी गेल्यानंतर खाली उतरावे लागले, या सगळ्या काळात ते फक्त त्यांच्या भाषणाचा विचार करत होते. एकदा त्यांना चाल त आत जावे लागेल असे सांगितल्यावर मी तिथे खूप संतापले, पोलिसांशी वाद घातला. शेवटी ते शांतपणे मंडपाकडे न जाता पुस्तकांच्या दुकानाकडे गेले. तिथे खूप खूप आनंदात होते. ते जिथे जात होते तिथे लोक इतक्या प्रेमाने त्यांना भेटत होते की माझ्या मनातला संताप थिजला. नंतर त्यांनी मल ा शांतपणे सांगितले, आता राग पुरे. मला जे सांगायचे आहे ते मी भाषणात सांगितले आहे. चर्चा त्या भाषणात व्यक्त केलेल्या मतांची व्हावी. अनावश्यक चर्चा टाळाव्यात. त्यांच्या मनात कोणाबद्दलही राग नव्हता. समारोपाच्या सत्रात त्यांनी नितीन गडकरींशी मनसोक्त गप्पा मारल्या. गडकरींचे भाषणही उत्तम झाले. व्यवस्था हा वेगळा भाग, त्यात दोष असू शकतो पण माणसे वेगळी. माणसांबद्दल त्यांना कधीही राग आला नाही. माणसेच त्यांच्या आयुष्याच्या केंद्रस्थानी होती.

आज मी ते गेल्यावर या तीन दिवसांचा विचार करते तेव्हा वाटते, त्या क्षणाचा त्यांनी किती काटेकोर विचार केला असेल. आपल्याला झालेला आजार वेगळा, पण आपल्याला मिळालेला सन्मान, आपल्यावर दाखवलेला विश्वास फार मोठा आहे याची जाणीव त्यांना होती. त्या सन्मानाचा, विश्वासाचा आदर करणे हेच स्वाभाविकपणे त्यांनी स्वीकारले. त्यांना आयुष्यभर माणसांनी खूप माया दिली, प्रेम दिले. आम्ही ते डोळ्यांत साठवत होतो. आमच्या मुलाबाळांना दाखवत होतो. त्यांच्याबरोबर आम्ही सेवाग्रामला, पवनारला गेलो. ज्या मूल्यांचा वारसा बाबांना मिळाला, त्याचे दर्शन आम्हांला त्यांच्याबरोबर झाले. वर्धा गाव मनात कायमसाठी कोरले गेले.

परत आल्यावर त्यांची शस्त्रक्रिया झाली. त्याची तारीख डॉक्टरांच्या सोयीनुसार न ठरवता, त्यांनी त्यांच्या कामाचा विचार करून ठरवली. सोमाटण्याच्या आमच्या घरी त्यांनी अनेकदा वास्तव्य केले. त्यांना, आईला आणि बापुकाका-सुमतीकाकूंना ते सोयीचे आहे. त्यात त्यांचे पुण्याचे सुहृद इथे सहज येऊ शकतात हे महत्त्वाचे. हळूहळू त्यांच्या चालण्याफिरण्यावर बंधने येत गेली तसे त्यांचे कार्यक्रमांसाठी फिरणे कमी झाले. त्याचा त्यांना फार त्रास झाला. न्युक्लियर थेरपीसाठी ते एकदा माझ्याकडे आले असताना भर पावसात

न्यायमूर्ती हळबेंना आपण भेटायला जाऊ असा हट्ट करायला लागले. मी जरा कां कूं केल्यावर त्यांनी म्हटले, 'जर मला माझ्या मनाप्रमाणे जगता येणार नसेल तर जगून काय फायदा?' मी हार मानली आणि त्यांना घेऊन गेले. ते मस्तपणे त्यांच्या जुन्या मित्राशी पाटीवर (दोघांनीही ऐकू येत नव्हते) गप्पा मारून परत आले आणि बाबांनी मला इमोशनल ब्लॅकमेल करून वाद जिंकला आहे याची जाणीव झाली.

गेली दोन वर्षे आईचा व्यवसाय, तिचे रूटीन मागे पडले आणि तिने तिचे आयुष्य बाबांभोवती गुंफले. तसेही तिचे आयुष्य गेले पंचावन्न वर्षे बाबांसारख्या लार्जर देंन लाईफ व्यक्तिमत्त्वाभोवतीच गुंतले होते, ते आता अजून गुंतले. आम्ही सर्वच बाबांची सर्वतोपरी काळजी घेत होतो.

एका बाजूला हे सुरू असतानाही बाबांच्या 'लोकशाही आणि हुकुमशाही'या पुस्तकाचे काम जोरदार सुरू होते. पुस्तकाचे लिखाण संपल्यानंतर मग पुस्तकाची निर्मिती कशी असावी याबद्दल ते 'राजहंस'च्या डॉ. सदानंद बोरसेंबरोबर हिरिरीने चर्चा करू लागले. गेल्या काही वर्षांत ज्या पुस्तकांची उत्तम निर्मिती झाली आहे ती पुस्तके जमवू लागले. प्रुफं तपासू लागले. त्यांचे लेखनिक सुरेश पाटील याही काळात नियमित घरी येत. ज्या दिवशी त्यांना जमत असे त्या दिवशी ते बाहेर अभ्यासिकेत येऊन काम करत, जेव्हा जमत नसे त्या वेळी पाटील बाकीची कामे करून देत. शेवटच्या तीन चार महिन्यांत त्यांची प्रकृती झपाट्याने ढासळली. आधी पडल्यामुळे झालेली शस्त्रक्रिया, त्यातून बरे होत असताना पुन्हा झालेला संसर्ग यामुळे ते थकले. ते टास्कमास्टर असल्यामुळे तसेच 'लोकशाही आणि हुकुमशाही' पुस्तकाचे काम संपल्यामुळे त्यांनी त्यांच्या मृत्यूनंतरची व्यवस्था करण्याचे काम हाती घेतले. आई, आम्ही तिघी आणि बापुकाका यांची त्यांना सगळ्यांत जास्त काळजी वाटत होती, त्यामुळे त्यांनी वेळोवेळी आमचा निरोप घेतला. बापूकाकांना भर दुपारी आजूबाजूला कुणीही नसताना बोलावले आणि एकांतात त्यांना जाणवलेले गेल्या पासष्ट वर्षांतल्या मैत्रीचे मर्म सांगितले. आईला तर सतत ते गेल्यावर तिने कसे जगावे हे सांगितले. अतिशय शांतपणे ते काम करत राहिले. मृत्यूच्या वाटेवर असताना ते मृत्यूला कधी हार मानून सामोरे गेले नाहीत. क्षीण झालेले बाबा रूम नंबर ३०१मध्ये कधी पाटीवर कधी डोळ्यांनी जीवनाशी संवाद करत होते, त्यांचा मृत्यू रूमबाहेर हा संवाद संपायची शांतपणे वाट बघत होता.

डिलन थॉमस म्हणतो -

And you, my father, there on the sad height,
Curse, bless me now with your fierce tears, I pray.

Do not go gentle into that good night.
Rage, rage against the dying of the light.
बाबा...
*त्या तिथे अंताच्या शिखरावर उभे राहून*
*तुमच्या अश्रूंच्या निखाऱ्यांनी*
*माझ्यावर कृपा करा...*
*रात्र शीतल आहे पण त्या रात्रीत विरू नका*
*प्रकाशाच्या विझण्याशी झगडत राहा, झगडत राहा...*

पंचवीसेक वर्षांपूर्वी बाबा त्यांच्या नव्वदीच्या घरातल्या वडलांना डॉक्टरांकडे घेऊन गेले होते. आजोबांना थोडं बरं नव्हतं.. डॉक्टरांच्या केबिनबाहेर जाताजाता त्यांनी डॉक्टरांना सांगितलं, हो.. आणि गेले काही दिवस माझ्या गळ्यात दुखतंय, सकाळी चालायला जातो तेव्हा जास्त.' बाबांचं बोलणं ऐकल्यावर डॉक्टरांनी त्यांना ताबडतोब स्ट्रेस टेस्ट करायला सांगितली, ती पॉझिटिव्ह आली, त्यांच्या हृदयाच्या रक्तवाहिन्यांत चांगलेच अडथळे आहेत असे अचानक समजले. नंतर त्यांची बायपास झाली आणि मोठे संकट टळले. आयुष्याच्या बाबतीत जर-तर काही नसते, असे अपघात रोज होत असतात किंवा टळत असतात हे सगळे माहीत आहे, पण आज बाबा नाहीत हे वास्तव पचवायचा प्रयत्न करत असताना मनात हा विचार येतो, की जर बाबांनी घसा दुखतोय असा पुसट उल्लेख केलाच नसता तर?

***भक्ती चपळगावकर***

---

## येथ चातुर्य शहाणे झाले

काही माणसे आपल्या आयुष्यात अवतरतात, आपल्या भरभरून कितीतरी देतात. प्रेम, जिव्हाळा, ज्ञान, शहाणपण या गोष्टींनी आपली झोळी भरून टाकतात. त्यांच्याबद्दलची मनात दाटलेली कृतज्ञता आपल्याला नीट व्यक्त करणेही जमत नाही आणि अचानक ते आपल्याला पोरके बनवून निघून जातात. त्यांच्या त्या प्रेमाला, वात्सल्याला पारखे झाल्याची खंत वाटते आणि जोडीला आपण त्यांच्या या वरदानाला खरेच पात्र होतो का, हे भलेमोठे प्रश्नचिन्ह. न्यायमूर्ती नरेन्द्र चपळगावकरांच्या निधनाने मीही या प्रश्नातच गुंतलो.

त्यांना बहुतेक सारे परिचित 'नानासाहेब' किंवा 'नाना' म्हणत. नानासाहेबांनी माझ्यावर आणि माझी पत्नी सुलभा हिच्यावर प्रेमाची, वात्सल्याची अमृतवर्षा केली. त्यामागे एकच कारण प्रकर्षाने दिसते, ते म्हणजे त्यांचा सहज स्वभावगुण.

त्यांच्या विस्तारित वसुधाकुटुंबात असे असंख्य लोक सामील झाले. त्या साऱ्यांच्या ललाटी या अमृतवर्षेचा आनंदयोग लिहिलेला होता.

'न्यायमूर्ती' ही उपाधी त्यांना केवळ व्यवसायाने मिळाली नव्हती; तर स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायतत्त्वांचे बाळकडू त्यांना बालपणापासून, घरापासूनच मिळाले होते.

नानासाहेबांचे वडील पुरुषोत्तमराव चपळगावकर हे हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक. विचाराने पक्के गांधीवादी. आपल्या बालपणीच्या आठवणी लिहिताना नानासाहेबांनी आपल्या वडिलांचा ज्या जिव्हाळ्याने, आदराने उल्लेख केला आहे; त्यावरून त्यांच्यावर वडिलांचा किती खोल प्रभाव होता, ते लक्षात येते. वडिलांची देशभक्ती, त्याग, त्यांना असलेला गांधी-विनोबांबद्दलचा आदर या साऱ्याचा अमिट ठसा नानासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वावर उमटलेला होता. नानासाहेबांच्या केवळ लेखन-भाषणातूनच नव्हे, तर आयुष्यभर त्यांनी पेललेल्या विविध जबाबदाऱ्यांमधून ही बाब वारंवार नजरेस पडते. साहजिकच वर्ध्याच्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद ही नानासाहेबांसाठीसुद्धा विशेष औचित्याची बाब ठरली.

'नरेन्द्र चपळगावकर' हे नाव वैचारिक लेखनासाठी अत्यंत सुपरिचित आणि सुप्रसिद्ध असले, तरी त्यांची वाङ्मयीन कारकीर्द सुरू झालेली होती ललित लेखनाने. त्यांच्या कथा- कविता 'सत्यकथा', 'किर्लोस्कर' अशा दर्जेदार नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या होत्या. 'किर्लोस्कर', 'स्त्री' आणि 'मनोहर' या नियतकालिकांच्या धोरणविषयक निर्णयांमध्येही त्यांचे मत विचारात घेतले जात होते. मात्र बहुआयामी प्रज्ञा लाभलेल्या नरेन्द्र चपळगावकरांचा पैस केवळ साहित्यापुरता मर्यादित राहिला नाही. घरातून झालेले संस्कार, महाविद्यालयीन काळापासूनच दिसून आलेले त्यांचे नेतृत्वगुण, शिक्षण घेताना लाभलेले प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे प्राध्यापक, समानशील असे जिवाभावाचे मित्र या साऱ्याची परिणती म्हणजे अखेरपर्यंत नरेन्द्र चपळगावकर साहित्यकारणाबरोबरच समाजकारण अन् राजकारणातही रस घेत राहिले.

नानासाहेबांनी महाविद्यालयीन जीवनातील निवडणुका, मराठवाडा साहित्य परिषदेच्या निवडणुका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीच्या निवडणुका तर जिंकल्याच होत्या; बीड नगरपालिकेत ते नगरसेवक म्हणूनही निवडून आले होते आणि त्यावेळी ते वयाने सर्वांत लहान नगरसेवक ठरले होते. मात्र आपल्या प्रत्येक निवडीच्या वेळी सामाजिक बांधिलकीचे भान राखत, लोकशाही प्रक्रियेचा मान राखत संस्थात्मक आणि

रचनात्मक कार्य करण्यासाठी मिळालेली संधी आणि जबाबदारी याच दृष्टिकोनातून त्यांनी काम केले.

समाजस्वास्थ्याबद्दलच्या आस्थेमुळेच नानासाहेबांची लेखणीही ललित लेखनाकडून वैचारिक लेखनाकडे वळली. आधुनिक महाराष्ट्राच्या विचारांची पायाभरणी करणारा एकोणिसाव्या शतकाचा प्रबोधनकाल असो, हैदराबादचा मुक्तिसंग्राम असो, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील लोकमान्य टिळक आणि म. गांधी यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढा असो अथवा उत्तरार्धातील पं. नेहरूंच्या पंतप्रधानकीची कारकिर्द असो - या सर्व राजकीय-सामाजिक घडामोडींचा वेधक ऊहापोह त्यांच्या 'त्यांना समजून घेताना', 'लो. टिळक आणि म. गांधी', 'पंतप्रधान नेहरू', 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ', 'कर्मयोगी संन्यासी', 'राज्यघटनेचे अर्धशतक' अशा अनेक ग्रंथांमधून येतो. त्यांचा प्रचंड व्यासंग, त्यांचे सखोल चिंतन, अनेक पैलू एकाच वेळी लक्षात घेऊन त्या सर्व पैलूंचे व्यामिश्र परस्परसंबंध उलगडून दाखवण्याची त्यांची हातोटी यांमुळे त्यांचे लेखन आशयसमृद्ध तर असतेच; शिवाय मुळात लालित्यपूर्ण लिखाणाची आवड असल्याने त्यांच्या वैचारिक लेखनालाही रसाळपणाची जोड मिळाली. (या 'रसाळपणा'त त्यांचे जीवश्चकंठश्च मित्र असलेल्या सुधीर रसाळांच्या सहवासाचाही वाटा मोठा !)

नानासाहेबांनी वयाची साडेआठ दशके पार केली आहेत, ही बाब त्यांच्या उत्साहातून आणि कार्यशीलतेतून कधीच लक्षात येत नसे. नव्याचे मनमोकळे स्वागत करणाऱ्या त्यांच्या उमदेपणामुळे त्यांच्याबरोबर बोलताना कुणालाच ज्येष्ठतेचा जाच अन् वाढत्या वयाचा काच किंचितही जाणवत नसे. वयातील अंतर सहजगत्या पुसून टाकून समोरच्या व्यक्तीला आपलेसे करण्याचा त्यांचा हातखंडा अगदी पहिल्या भेटीपासून प्रत्ययाला येत असे.

आपली भूमिका कोणतीही असो, सार्वजनिक सभेतील वक्ते असोत वा स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असोत वा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष- प्रत्येक भूमिकेत त्यांनी आचार, विचार अन् उच्चारातून लोकशाहीच्या पायाभूत न्यायतत्त्वांचा जागर केला. वर्तमानकाळ हा गढुळलेला, चिरफाळलेला काळ बनला आहे. विरोधी विचारांबद्दल विद्वेष बाळगणे, विरोधकांना या जगातून संपवूनच टाकण्याचा प्रयत्न करणे अशा अत्यंत पराकोटीच्या द्वेषाने भरलेल्या या काळात नानासाहेब हे सर्वसमावेशक, समाजहितैषी, समतोल आणि सर्वांना जोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या विचारांचे प्रतिनिधित्व करीत होते. नुकत्याच त्यांनी लिहिलेल्या 'लोकशाही आणि

हुकुमशाही' या पुस्तकात लोकशाहीची पायाभूत तत्त्वे त्यांनी अत्यंत विस्ताराने मांडलेली आहेत. लोकशाहीच्या संरक्षणासाठी जो जागर सतत करावा लागतो, त्याबद्दल नानासाहेबांनी सर्वांनाच आवाहन केले आहे.

नानासाहेबांबरोबर व्यतीत केलेले क्षण माझ्या आयुष्यातील मर्मबंधातील ठेव आहे. विचार, आशय या दृष्टीने केवळ व्यासंगातूनच ते माझ्यापर्यंत पोहोचत नव्हते; तर ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे 'येथ चातुर्य शहाणे झाले' या उक्तीची प्रचिती देणारे त्यांच्याबरोबरचे संवाद असत.

नानासाहेबांच्या जाण्यामुळे मी माझ्या वडिलांना परत एकदा गमावले आहे.

***डॉ. सदानंद बोरसे***

---

## विद्वेषाच्या वणव्यातील विवेकी सूर

*न्या. नरेन्द्र चपळगावकर यांना 'शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार' प्राप्त झाला, त्या पुरस्कार वितरणप्रसंगी दिलीप माजगावकर यांनी केलेल्या भाषणातील हा संपादित अंश.*

तुम्हांला एखादा लेखक जेव्हा आवडतो, तेव्हा त्याची लेखनप्रकृती तुम्हांला आवडते. ती तुमच्या वाचनप्रकृतीशी मिळतीजुळती असते. मला न्या. नरेन्द्र चपळगावकरांचं लेखन कसं वाटतं? एखादा शांत, धीरगंभीर प्रकृतीचा गायक त्याची गाण्याची मैफील जशी हळूहळू खुलवत नेतो आणि योग्य वेळी समेवर येतो; तसं मला चपळगावकरांचं लेखन वाटतं. ते मध्येच एखादं चक्रावणारं विधान करून धाडकन समेवर येत नाहीत. एखाद्या व्यक्तीकडे पूर्वग्रहदूषित कोनात ते पाहत नाहीत, उलट त्या व्यक्तीला अनेक अंगांनी जाणून घेण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांना शेरेबाजी मान्य नाही, तसंच व्यक्ती केवळ काळ्या आणि पांढऱ्या रंगात असते, असंही ते मानत नाहीत, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या लेखनात तुम्हाला औषधालाही अभिनिवेश सापडणार नाही.

मी जे म्हणतोय, त्याचा प्रत्यय तुम्हांला त्यांच्या 'त्यांना समजून घेताना' या पुस्तकातून येईल. टिळक, गांधी, नेहरू, पटेल, सुभाषचंद्र, राजाजी अशा स्वातंत्र्यलढ्यातील बिनीच्या नेतृत्वाची ही व्यक्तिचित्रं आहेत. पुस्तकाचं नावच त्यांची लेखनप्रकृती सांगणारं आहे.

या सगळ्या व्यक्ती मोठ्या आहेत. एका कठीण काळात त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचं नेतृत्व केलेलं आहे. त्यांचे स्वभाव, त्यांतले कंगोरे, त्यांची



न्या. नरेन्द्र चपळगावकर यांना १५ जुलै २०१८ रोजी प्राचार्य शिवाजीराव भोसले पुरस्कार प्रदान करताना दिलीप माजगावकर आणि प्रा. मिलिंद जोशी

बलस्थानं, त्यांची दुबळी स्थानं, त्यातून त्यांनी घेतलेले बरे-वाईट निर्णय, त्या निर्णयाचे इतिहासावर झालेले परिणाम या सगळ्या सगळ्या गोष्टी चपळगावकर समजून घेतात आणि देतात. या लोकांनी गाजवलेल्या कर्तृत्वाचं जसं त्यांना भान आहे; तसं अनेक प्रसंगी या मोठ्या व्यक्तींच्या स्वभावदोषामुळे असेल किंवा तत्कालीन परिस्थितीचं पुरेसं आकलन न झाल्यामुळे असेल, पण त्यांचे काही निर्णय चुकले, हेही चपळगावकर आपल्याला सांगतात. पण या लोकांची सचोटी आणि देशभक्ती वादातीत होती, असंही ते आवर्जून म्हणतात.

आज तुमच्या-माझ्याभोवतीचं राजकीय-सामाजिक वातावरण अस्वस्थ करणारं आहे. कोणत्याही व्यक्तीबद्दल, प्रश्नाबद्दल सांगोपांग विचार न करता, त्या प्रश्नांचे अनेक पदर, अनेक पैलू समजून न घेता आपल्या सोयीचे ढोबळ शिक्के मारणं, व्यक्तिगत असूया, मत्सराचा त्यावर रंग चढवून त्याला उथळ रूप देणं ही पद्धत, ही फॅशन रूढ झालेली आहे. समाजमाध्यमांच्या झंझावातानं हा विद्वेषाचा वणवा सगळीकडे पसरतो आहे.

नेमक्या याच वेळी समाजाला विचारप्रवृत्त करण्यासाठी, त्याच्या विधायक भरणपोषणासाठी न्या. चपळगावकरांच्या लेखणी-वाणीची आज नितांत गरज आहे.

***दिलीप माजगावकर***

# राजहंसी पार

काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

## ‘सप्रेम नमस्कार’ या अभिवाचन कार्यक्रमातून घडला ‘दिगमां’च्या अंतरंगाचा प्रवास



दिलीप माजगावकर लिखित ‘पत्र आणि मैत्र’ व ‘वाणी आणि लेखणी’ या पुस्तकांतील निवडक भागांचे अभिवाचन करताना अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व कुणाल रेगे

मुंबईच्या सांस्कृतिक जीवनातील प्रसिद्ध रंगकर्मी कुणाल रेगे यांच्या संकल्पनेतून व दिग्दर्शनातून साकारलेला, तसेच राजहंसी लेखिका व प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्यासमवेतच्या अभिवाचनाने आणि दीप्ती कुलकर्णी यांच्या सुरेल वाद्यसंगतीने रसिकांच्या मनात सहजसुंदर उतरत गेलेला कार्यक्रम म्हणजे ‘या हृदयीचे त्या हृदयी घातले’ असा ‘दिगमां’चा चिंतनशील, भावगर्भ पत्रसंवादाचा रंगमंचीय आविष्कार होय.

दि. १५ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता भांडारकर संस्थेच्या फिरोदिया सभागृहात हा अभिवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रस्तुत कार्यक्रमातून ‘दिगमां’चे लेखन आणि लेखकांशी असलेले त्यांचे मैत्र अशा हृद्य आठवणींना उजाळा मिळाला. या समारंभास डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. नीतीन करमळकर, डॉ. सदानंद मोरे,

# उलगडले ‘दिगमां’चे व्यक्तिमत्त्व

**दिलीप माजगावकरांच्या पत्रांचे अभिवाचन**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मितभाषी असूनही नेमके आणि स्पष्ट बोलणारे, नर्मविनोदी, भाषा सौंदर्य जपणारे, लेखक आणि वाचकांना जोडताना स्वतःही आशयघन आणि रसाळ लेखन करणारे राजहंसी दिगमा अर्थात दिलीप माजगावकर बुधवारी उलगडले. दिगमांचे लेखन आणि लेखकांशी मैत्र अशा हृद्य आठवणींना उजाळा मिळाला; तेव्हा समोर बसलेल्या खुद्द दिगमांच्याही चेहऱ्यावर हलकीशी लकेर उमटली.

राजहंस प्रकाशनाचे संचालक दिलीप माजगावकर लिखित 'पत्र आणि मैत्र'; तसेच 'वाणी आणि लेखणी' या पुस्तकांतील काही भागांचे वाचन प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि कुणाल रेगे यांनी केले. भांडारकर संस्थेच्या फिरोदिया सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रकाशक आणि लेखक दिगमा असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व रसिकांना अनुभवता आले. दिगमांनी राजहंसी लेखकांना लिहिलेल्या पत्रातील भाषा समृद्ध आशय ऐकणे विरळा अनुभव होता.



दिलीप माजगावकर लिखित 'पत्र आणि मैत्र'; तसेच 'वाणी आणि लेखणी' या पुस्तकांतील काही भागांचे वाचन प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि कुणाल रेगे यांनी केले.

श्री. पु. भागवत, विजय तेंडुलकर, वि. स. वाळिंबे, वीणा गवाणकर, अनिल बर्वे आणि अभय बंग या लेखकांना दिगमांनी लिहिलेल्या पत्रांचे वाचन कुलकर्णी आणि रेगे यांनी केले. 'आमच्या पुस्तकाची वाचकाशी चुकामूक झाली, तर काहीच मदतीला येत नाही. तेव्हा वाचक बरोबर असतात. चूक आमची असते. चांगले पुस्तक आकार घेण्यासाठी वाचकांशी तारा जुळणे महत्त्वाचे असते,' असे दिगमांनी एका पत्रात नमूद केल्याचे कुलकर्णी आणि रेगे यांनी सांगितले.

'तेंडुलकरांमुळे मी पत्रलेखनाकडे वळलो. मी दर सोमवारी मुंबईत असायचो, तेव्हा तेंडुलकरांचा सहवास लाभला. लेखनातून व्यक्त हो, हा सल्ला त्यांनी दिला. कामाची गरज, गंमत आणि मोकळे होण्यासाठी मी लिहित गेलो,' अशी भावना दिगमा यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ पत्रकार प्रशांत दीक्षित यांनी प्रास्ताविक केले.



डावीकडून डॉ. शां. ब. मुजुमदार, दिलीप माजगावकर, सोनाली कुलकर्णी,
डॉ. सदानंद मोरे, कुणाल रेगे, डॉ. नितीन करमळकर आणि दीप्ती कुलकर्णी

डॉ. अरुणा ढेरे, मेजर जनरल पित्रे, मंगला आठलेकर, विकास गायतोंडे, रेखा माजगावकर यांसह साहित्य-कला-संस्कृती क्षेत्रांतील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. दिलीप माजगावकर लिखित 'पत्र आणि मैत्र', तसेच 'वाणी आणि लेखणी' या पुस्तकांतील निवडक पत्रांचे आणि लेखांचे अभिवाचन या कार्यक्रमात करण्यात आले.

श्री. पु. भागवत, विजय तेंडुलकर, वीणा गवाणकर, अविनाश धर्माधिकारी आणि डॉ. अभय बंग; या लेखकांना दिगमांनी लिहिलेल्या पत्रांचे वाचन सोनाली कुलकर्णी आणि कुणाल रेगे यांनी केले. 'अंतरीचे बाहेर उमटे' या भागातील अनिल बर्वे या व्यक्तिचित्राचे दोघांनी त्यांतील शब्दांइतक्याच ताकदीने आणि भावोत्कटतेने अभिवाचन करत रसिकांची दाद मिळवली.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना दिलीप माजगावकर म्हणाले की, 'माझी बहीण कुमुद, म्हणजेच निर्मला पुरंदरे हिच्यामुळे व विजय तेंडुलकरांमुळे मी पत्रलेखनाकडे वळलो. मी दर सोमवारी मुंबईत असायचो, तेव्हा तेंडुलकरांचा सहवास लाभला. लेखनातून व्यक्त हो, हा सल्ला त्यांनी मला दिला.'

राजहंसचे मुख्य संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ज्येष्ठ पत्रकार प्रशांत दीक्षित यांनी समयोचित प्रास्ताविक करत दिलीप माजगावकर


गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...



**पत्र आणि मैत्र**

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...



**वाणी आणि लेखणी**

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. ₹ १००)

यांचा यशस्वी प्रकाशक म्हणून घडलेला प्रवास, त्यांची विजिगीषूवृत्ती, श्री. पु. आणि माजगावकर यांच्यातील हृद्य आणि प्रगल्भ पत्रसंवाद, पुस्तकातील ठेवणीतील दागिना म्हणता येईल असा ऐवज म्हणजे माजगावकरांनी चितारलेली शब्दचित्रे अशा अनेकच मौलिक बाबींवर प्रकाश टाकला. महेश एलकुंचवार यांच्या पत्राचा संदर्भ देत दिक्षित यांनी महत्त्वाची नोंद केली. ती म्हणजे, 'माजगावकरांची भाषणे नुसती वाचनीय नाहीत, तर ती संग्रहणीयही आहेत. त्यांची ओघवती, स्पष्ट भाषा, तिचे सौष्ठव यांमुळे त्या भाषणांना साहित्यमूल्य प्राप्त झाले आहे.' श्रीपुंच्या एका महत्त्वाच्या पत्राचा संदर्भही त्यांनी दिला. तो असा : सन १९९६मध्ये श्रीपुंनी गिरीश प्रभुणेंना लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, 'दिलीपरावांचे विचार, त्यांचे शब्द, रचना इतकी उत्कृष्ट आहे की; त्यांनी आपल्या आठवणी लिहिल्या तर त्या प्रसिद्ध करणे मौजेला आवडेल.' मराठी साहित्यविश्वावर मोहर उमटवणाऱ्या प्रकाशकांनी माजगावकरांविषयी काढलेल्या या गौरवोद्गारांतून त्यांच्या लेखनाची उंची कळते.

राजहंसचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.


आजच्या तरुण पिढीला वृद्धसंगोपनाकडे केवळ भावनिक आणि मानवतावादी दृष्टिकोनातून नाही, तर आर्थिक दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे. कसे, ते समजावून सांगणारे आगळेवेगळे पुस्तक....



**सांजवात**

प्राजक्ता पाडगांवकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच गुरुदत्तच्या चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय या अंगांनी केलेला विचार...

**गुरुदत्त**
तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# विवाह नाकारताना : मुक्त संवाद

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या वतीने जानेवारी महिन्यापासून ‘नवीन पुस्तकांवर चर्चा’ या सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत विनया खडपेकरलिखित ‘विवाह नाकारताना’ या पुस्तकावर दि. २० जानेवारी रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात मुक्त संवाद घेण्यात आला. डॉ. उज्ज्वला गोखले व डॉ. प्रिया निघोजकर यांनी विनयाताईंशी संवाद साधला. पुस्तकलेखनामागची प्रेरणा, भारतीय समाजात स्त्रियांवर विवाहाबाबत असलेला दबाव, लग्नासाठी मुलगी दाखवणे या पारंपरिक प्रथेतील अनिष्ट गोष्टी,



डावीकडून डॉ. उज्ज्वला गोखले, विनया खडपेकर, डॉ. प्रिया निघोजकर

‘न-लग्न’ ही संकल्पना, त्यातील धोके अशा अनेक अंगांनी हा मुक्त संवाद फुलला. अत्यंत परखड, स्पष्ट शब्दांत विनयाताईंनी दिलेली उत्तरे सर्वांनाच अंतर्मुख करणारी होती. सा. भ. मं.च्या अध्यक्ष अंजली कुलकर्णी, विश्वस्त डॉ. मंदा खांडगे तसेच डॉ. किर्ती मुळीक, कथालेखिका विनिता ऐनापुरे आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

❖

# मराठी झेंडा आता अटकेपार !



सुप्रसिद्ध सिने-दिग्दर्शक, सिनेविद **अरुण खोपकर** यांच्या प्रतिभावान लेखणीतून साकारलेली 'राजहंसी' ग्रंथसंपदा आता मराठीसोबत अन्य भारतीय आणि विदेशी भाषांमध्येही उपलब्ध !

गुरुदत्त



इटालियन



इंग्रजी




कन्नड






गुजराथी



मल्याळम




हिंदी

प्राक-सिनेमा




हिंदी




चलत्-चित्रव्यूह



कन्नड





हिंदी

## अरुण खोपकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

## वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

### सांजवात

प्रिय श्रीमती पाडगावकर,

आपला औपचारिक परिचय अद्याप झालेला नाही, पण आपलं ‘सांजवात’ हे पुस्तक वाचल्यानंतर एका जुन्या सुहृदाची भेट झाल्यासारखं वाटलं. आपलं जगणं म्हणजे एकापाठोपाठ अविरत घडणारे अपघात आणि योगायोग असतात. त्यातले कित्येक सुखद असतात. माझ्या श्रीनिवास वायकर या मित्राने ७५व्या वाढदिवसाची भेट म्हणून मला नेमकं ‘सांजवात’ पुस्तक द्यावं हा तो सुखद आणि विलक्षण योगायोग.

पुस्तकाच्या पहिल्या वाचनात मला फक्त या विषयाचा आणि आपल्या अफाट व्यासंगाचा मोठा आवाका लक्षात आला, तर दुसऱ्या वाचनात अनेक तपशील सावकाशीनं चाखता आले. माझं स्वत:चं आयुष्य आणि आपल्या सभोवतालचं वास्तव यांच्याशी लेखिकेचं सर्वांगीण आणि माहितीपूर्ण विवेचन ताडून पाहत असता मी वारंवार चकित होत राहिलो. वार्धक्य आणि मृत्यू या संकल्पनांचा विचार तुम्ही ज्या एका विशाल तात्त्विक परिप्रेक्ष्यापर्यंत नेऊन ठेवलाय, त्याच्या दर्शनाने मी प्रभावित झालो. १५० पृष्ठांच्या मर्यादेत राहून एवढं काही साध्य होऊ शकतं यावर माझा अजूनही विश्वास बसत नाहीय. तर मी म्हणेन की ‘सांजवात’ ही मराठी साहित्य-प्रांतातली एक अद्‌भुत घटना आहे. त्रिवार अभिनंदन!

***प्रभाकर (बापू) करंदीकर***, पुणे

**मुखपृष्ठावरील पुस्तकांविषयी**

| | | |
|---|---|---|
| ☐ लोकशाही आणि हुकुमशाही | नरेन्द्र चपळगावकर | ₹ ४५०/- |
| ☐ पाकिस्तान का मतलब क्या? | श्रीधर लोणी | ₹ ४५०/- |
| ☐ वीस प्रश्न | महेश एलकुंचवार | ₹ २२०/- |
| ☐ भीमसेन (मुलांसाठी) | अनु. आरती रानडे | ₹ २००/- |

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा
**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**
**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**‘राजहंस ॲप’**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
ॲंड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता
Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अमृप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# व्हेरिकोज व्हेन्स







## आजाराची वृद्धी व तीव्रता कमी करण्यासाठी उपयुक्त आयुर्वेदिक तेल

लक्षणे - पाय दुखणे, पायाला सूज येणे, पाय जड वाटणे, पायांच्या शिरा फुगून वेड्यावाकड्या होणे आणि प्रगत अवस्थेत तळपायाजवळ फुटून रक्तस्त्राव होणे. व्याधी दुर्धर अवस्थेत जाण्यापूर्वीच वापरण्यास सुरुवात करा.




सूचना : व्हेरिकोज व्हेन्स ही एक दुर्धर व्याधी आहे. हे तेल विकाराची तीव्रता कमी करणे व प्रगती रोखणे आणि वेदनांपासून आराम देण्यासाठी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृती, विकाराची तीव्रता आणि शारिरिक प्रतिसाद यानुसार परिणामांमध्ये फरक पडू शकतो.

| 100 ml पॅक | 200 ml पॅक |
|---|---|
| MRP Rs. 450/- | MRP Rs. 750/- |

(सर्व करांसहित)

**सर्वत्र प्रमुख मेडीकल स्टोअर्समध्ये उपलब्ध**

## वेरिहील कॅप्सूल्स

सुद्धा उपलब्ध

**Esvee Pharmachem Pvt. Ltd.**
412, Narayanpeth, Pune - 411030.
Ph :020 24450072 / 73.

**Helplines** (10 am to 6 pm only) **: 7888011004 ; 9423044267**

Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post


# केस गळतायेत?






मजबूत व निरोगी
केसांसाठी

## नोविग

रोज सकाळ - संध्याकाळ
१-१ गोळी

**मेडीकल व आयुर्वेदिक स्टोअर्समध्ये उपलब्ध**

आपल्या परिसरात उपलब्धतेसाठी Whats App वर संपर्क करा
वितरक : एस्व्ही फार्माकेम प्रा. लि. 412, नारायण पेठ, मुंजाबा लेन, पुणे- 411030.

eSVee 9423044267 7888011004 FIND US ON


प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी
रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ,
पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे